कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ४ जून २०२६

किंमत ४ ₹

## आज सुरेश घरत यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



**रायगड :** शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांचा गुरुवारी (दि. ४) वाढदिवस आहे. यानिमित्त वरसोलीमध्ये रक्तदान व मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. चित्रलेखा पाटील यांच्या सहकार्याने लायन्स क्लब अलिबाग व रक्तबंध सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आणि लायन्स हेल्थ फाऊंडेशन यांच्या सौजन्याने हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. अलिबाग तालुक्यातील वरसोली कोळीवाडा येथील खंडोबा मंदिरामधील सभागृहात •> पान २ वर

## भीषण अपघातात एक ठार

**नवीन पनवेल :** पिकअपने पुढे जाणाऱ्या ट्रेलरला धडक दिल्याने झालेल्या अपघातात चालक जयपाल खोपटकर (रा. दिघी श्रीवर्धन) याचा मृत्यू झाला, तर चौघेजण जखमी झाले. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात दोन जून रोजी करण्यात आली. दोन जून रोजी मध्यरात्री १२ च्या सुमारास डोंबाला कॉलेज, पनवेल समोरील ब्रिजवर पळस्पे ते जेएनपीटीकडे जाणाऱ्या लेनवर पिकअप क्रमांक एमएच ०६ बी डब्ल्यू ६१०१ वरील चालक जयपाल हाश्या खोपटकर यांनी पिकअप भरधाव वेगाने चालवला आणि पुढे •> पान २ वर





# नवेदर बेली पुलाकडे ‘बांधकाम’ची पाठ ‘कांदळवन’कडे पुरावा

**। चौल । प्रतिनिधी ।** अलिबाग तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा मुख्य मार्गावरील नवेदर बेली पुलाची अवस्था अत्यंत भयावह असून, कधीही कोसळून पडेल अशा स्थितीत आहे. बेली पुलाच्या दुरुस्तीसाठी कांदळवन विभागाची परवानगी मिळाली नसल्याने दुरुस्ती करता आलेली नाही, असा दावा सार्वजनिक विभागाने केला आहे. मात्र, बांधकाम विभागाचा दावा कांदळवन विभागाने खोडून काढत सदर प्रस्ताव दोन महिन्यांपूर्वी म्हणजेच मार्चमध्ये पाठविला असून, आम्ही तो तात्काळ नागपूर येथील कार्यालयाकडे पाठविला आहे. परंतु, यातील काही त्रुटी आहेत, त्याची बांधकाम विभागाने अद्याप पूर्तता केली आहे का, याबाबत त्यांनी उत्तर द्यावे. आपल्यालाच सगळं समजतं, असं काम करताना चालत नाही, अशा स्पष्ट शब्दात कांदळवन अधिकाऱ्यांनी खडसावले आहे. सार्वजनिक विभाग खोटे बोलत असून, वर्षभर झोपेत असणाऱ्या, जनतेच्या जीवाचे काहीच पडलेले नसलेल्या पूल पडल्यानंतरच, पुलाखाली माणसं मेल्यानंतरच जागे होणार का? असा परखड सवाल स्थानिक जनता विचारत आहे. •> सविस्तर वृत्त पान ३ वर

“वर्षभरापासून सार्वजनिक बांधकाम विभाग आमच्या मागे फिरत आहे. त्यांना प्रस्ताव तयार करायला सांगितला होता. त्यांनी तो वेळेवर दिलेला नाही. मार्चमध्ये प्रस्ताव दिल्यावर आम्ही तात्काळ नागपूर कार्यालयाकडे पाठविला आहे. परंतु, या प्रस्तावात काही त्रुटी असून, त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. त्यांनी व्यवस्थित प्रस्ताव दिला असता, तर आतापर्यंत काम सुरू झाले असते. सीआरझेडची परवानगी घेणे त्यांना माहिती होते, फॉरेस्टची परवानगी आवश्यक आहे, हे त्यांना माहिती नाही का? त्यांनाच सगळं समजतं, आम्हाला काहीच नाही का?

– कुलदीप पाटकर, कांदळवन कक्ष अधिकारी, अलिबाग”

“पुलाचे काम मंजूर आहे. टेंडर होऊन वर्कऑर्डरही झाली आहे. परंतु, कांदळवन विभागाने ते काम थांबवले आहे. परवानगी घेतल्यानंतरच पुलाचे काम करा, असे सांगण्यात आले आहे. त्यानंतर प्रस्ताव आम्ही बनवला असून, तो प्रोसेसमध्ये आहे. याबाबतचा पाठपुरावा सुरू आहे.

– मोनिका धायतडक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग”

**पुलासाठी कायदा कठोर; जेट्टीसाठी मात्र सॉफ्ट कॉरिडॉर?** | **बेली पुलाबाबत प्रशासनाचा ‘ब्लेम गेम’** | **निर्लज्ज प्रशासकीय अधिकाऱ्यांचा नागरिकांच्या जीवाशी खेळ**

## उष्माघातामुळे तरुणाचा मृत्यू

**। रसायनी । प्रतिनिधी ।**



कष्टकरीनगर येथील हिरामण किसन काळे (५५) हे डोंगराच्या मध्यभागी असलेल्या खंडोबा मंदिराकडे जात असताना वाटेत त्यांना उष्माघातामुळे चक्कर येऊन मृत्यू झाला. त्यांना ग्रामीण रुणालय, चौक खालापूर येथे उपचारासाठी नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासून ते मयत झाल्याचे घोषित केले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई बाचकर अधिक तपास करीत आहेत.

## पनवेलमध्ये हायप्रोफाईल वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश

■ **पनवेल शहर पोलिसांची कारवाई**

■ **पीडित तरुणीची केली सुटका**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर पोलिसांनी करंजाडे भागातील एका फ्लॅटवर छापा टाकून त्याठिकाणी सुरू असलेला वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी एका २० वर्षीय तरुणीची सुटका केली असून, वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या ३३ वर्षीय महिलेला ताब्यात घेतले आहे. गेल्या काही महिन्यांपासून या महिलेने पीडित तरुणीच्या मदतीने सदर फ्लॅटमध्ये वेश्याव्यवसाय चालवत असल्याचे तपासात आढळून आले आहे.

पनवेल येथील करंजाडे परिसरातील एका इमारतीत वेश्याव्यवसाय सुरू असल्याची गोपनीयमाहितीपनवेलशहरपोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने करंजाडे येथील गणेश पार्क इमारतीमधील संशयित रूम नंबर १०३ मध्ये बनावट ग्राहकाला पाठवून खात्री केली. यावेळी सदर फ्लॅटमध्ये वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या आरोपी महिलेने बनावट ग्राहकाकडून वेश्यागमनाचे तीन हजार रुपये स्वीकारले. त्यानंतर २० वर्षीय पीडित तरुणीसोबत वेश्यागमनासाठी पाठवून दिले. यावेळी बनावट ग्राहकाने पोलिसांना इशारा देताच पोलिसांनी सदर फ्लॅटवर छापा टाकला. यावेळी एक महिला पीडित तरुणीकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे आढळून आल्यानंतर पोलिसांनी पीडित तरुणीची सुटका करुन महिलेला ताब्यात घेतले.

## पंधरा वर्षीय मुलीवर अत्याचार


**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिला गरोदर ठेवल्याप्रकरणी आरोपी मंगेश पवार (रा. पोदी क्रमांक एक, नवीन पनवेल) याच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित मुलगी घरी एकटी असताना तिला खेळण्याच्या बहाण्याने एप्रिल महिन्यात आरोपी मंगेश पवार याने तिच्यावर अत्याचार केला. यात ती गर्भवती राहिली. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# रायगडात भीषण पाणीटंचाई

■ **७३ गावे, २५८ वाड्यांची टँकरवर भिस्त**

■ **कोट्यवधींच्या योजनांनंतरही पाण्यासाठी वणवण**




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

केंद्र आणि राज्य शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून राबविलेल्या जलजीवन मिशनच्या यशाच्या गप्पा रंगत असतानाच रायगड जिल्ह्यातील वास्तव मात्र धक्कादायक आहे. जून महिन्याच्या सुरुवातीलाच जिल्ह्यातील तब्बल ७३ गावे आणि २५८ वाड्यांतील १ लाख ३१ हजार ९९ नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे जलजीवन मिशनच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या आकडेवारीनुसार, १ जूनअखेर जिल्ह्यात ७० खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. विशेष म्हणजे एकही शासकीय टँकर कार्यरत नसून संपूर्ण यंत्रणा खासगी टँकरांवर अवलंबून आहे. •> पान २ वर

# कायद्याचे रक्षकच आमनेसामने!

## उरणमध्ये पोलीस-वकील संघर्ष शिगेला

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण पोलीस ठाण्यात घडलेल्या कथित गैरवर्तणुकीच्या घटनेने संपूर्ण रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली असून, पोलीस प्रशासन आणि वकील संघटना यांच्यातील संघर्ष आता उघडपणे समोर आला आहे. अशिलाच्या तक्रारीसंदर्भात पोलीस ठाण्यात गेलेल्या एका वकिलाला पोलीस अधिकाऱ्याने धक्काबुक्की करत शर्टची कॉलर पकडली आणि मारहाणीची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर प्रकरणाने नवे वळण घेतले असून, उरण बार असोसिएशनने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ॲड. गोविंदा नरेश घरत हे आपल्या अशिलासह तक्रार नोंदविण्यासाठी उरण पोलीस ठाण्यात गेले होते. तक्रार नोंदवून घेण्याच्या प्रक्रियेदरम्यान त्यांचा आणि पोलीस उपनिरीक्षक निलेश विठ्ठल कोडाळकर यांच्यात वाद झाला. तक्रारदाराची बाजू सविस्तर नोंदवून घेण्याची मागणी केल्यानंतर वातावरण तापल्याचा दावा करण्यात आला असून, त्यानंतर धक्काबुक्की, अरेरावीची भाषा आणि धमकी देण्यात आल्याचा आरोप तक्रार अर्जात करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, या घटनेचे चित्रीकरण मोबाईलमध्ये झाल्याचा दावा करण्यात आला असून, संबंधित व्हिडीओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. त्यामुळे या प्रकरणाची चर्चा उरणसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात रंगू लागली आहे. •> पान २ वर

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल भागात राहणाऱ्या एका तरुणाने एका अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून, तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याने पीडित मुलगी गरोदर राहिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पीडित मुलीला तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. नेरूळ पोलिसांनी या प्रकरणात पीडितेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या तरुणाविरोधात गुन्हा दाखल करून पुढील •> पान २ वर

**सुरक्षेसाठी दीड हजार पोलिसांचा बंदोबस्त** | **रुग्णवाहिकांसह १३ विशेष वैद्यकीय पथके तैनात**

# शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी रायगड सज्ज

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून ६ जून रोजी किल्ले रायगडावर होणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्यासाठी पोलीस आणि आरोग्य प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. दोन लाखांहून अधिक शिवप्रेमी रायगडावर दाखल होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांच्या सुरक्षेसह आरोग्य सुविधांसाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज करण्यात आली




आहे. सोहळ्यासाठी सुमारे दीड हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून, २४७ रुग्णवाहिका सेवा, विशेष वैद्यकीय पथके आणि मुबलक औषधसाठाही उपलब्ध ठेवण्यात आला आहे. •> पान २ वर

### विशेष वैद्यकीय पथके

जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या प्रत्येक पथकात एक वैद्यकीय अधिकारी, एक समुदाय आरोग्य अधिकारी आणि एक आरोग्यसेवक यांचा समावेश असणार आहे. ही पथके कोंझर पार्किंग, वाय जंक्शन, चित्त दरवाजा ते महादरवाजा मार्ग, महादरवाजा, वालसुरे पार्किंग, पाचाड धर्मशाळा, नाणे दरवाजा, शिवसृष्टी पार्किंग, कवळीचा माळ, अशा एकूण १३ ठिकाणी तैनात राहून आरोग्य सेवा पुरविणार आहेत.

PNP CYRUS POONAWALLA SCHOOL
NAGAON CBSE CURRICULUM (SINCE 2017)

LEARNING,GROWING, THRIVING, TOGETHER,

Located in a non-industrial, nature-friendly setting, the school provides a calm and healthy atmosphere that supports focused learning and overall well-being.


ADMISSION OPEN
NURSERY TO X




HOLISTIC DEVELOPMENT

The institution places clear emphasis on the holistic development of students, ensuring equal importance to academics, physical fitness, and life skills.





SWIMMING FOR ALL

A major highlight is the half Olympic-length swimming pool, where free swimming classes are provided to all students, promoting fitness and confidence from an early age.

Best Sports Facilities in Alibag

In addition, the school boasts extensive sports facilities, including a basketball court, tennis court, and a football ground, giving students opportunities to actively engage in sports and develop teamwork, discipline, and leadership.



9822771540/9272594803/9168137591
pnpedusoc@gmail.com www.cyruspoonawallaschool.com
Opp. Hiranandani Sands, Near Mahendra Colony, Nagaon Khari Rd, Nagaon Village, Taluka, Alibaug, District. Raigad - 402204.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# कोटींचा सीसीटीव्ही प्रकल्प फसला?

■ १२० पैकी ५५ कॅमेरे बंद
■ पेणकरांच्या सुरक्षेशी खेळ,
■ पोलिसांची वाढली डोकेदुखी




। पेण । प्रतिनिधी ।

पेण शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी तब्बल १ कोटी ४९ लाख ५७ हजार रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या सीसीटीव्ही प्रकल्पातील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. शहरभर बसविण्यात आलेल्या १२० पैकी तब्बल ५५ सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याची माहिती पुढे आली असून, यामुळे नागरिकांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पेण नगरपालिकेने आरोही प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला हा प्रकल्प उभारण्याचे काम दिले होते. ठेक्यानुसार १२४ सीसीटीव्ही कॅमेरे, ४३ पोल, दीड टन क्षमतेचा एसी, स्वतंत्र बॅटरी बॅकअप आणि दोन वर्षांची देखभाल व्यवस्था अपेक्षित होती. मात्र, प्रत्यक्षात केवळ १२० कॅमेरे बसविण्यात आल्याचा दावा केला जात आहे. तसेच ४३ ऐवजी ३० ते ३१ पोल उभारण्यात आले असून, दीड टन एसीच्या जागी एक टन क्षमतेचा एसी बसविण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

सर्वात गंभीर बाब म्हणजे, कॅमेऱ्यांसाठी आवश्यक असलेला बॅटरी बॅकअप उपलब्ध नसल्याने वीजपुरवठा खंडित होताच संपूर्ण यंत्रणा बंद पडते. परिणामी, चोरी, पाकीटमारी, मोबाईल चोरी किंवा इतर गुन्ह्यांच्या तपासासाठी आवश्यक असलेले फुटेज अनेकदा उपलब्ध होत नसल्याची तक्रार आहे.

या प्रकल्पाचा कंट्रोल रूम नगरपालिकेत असणे अपेक्षित असताना तो सध्या पेण पोलीस ठाण्यात कार्यरत आहे. त्यामुळे यंत्रणेतील त्रुटींचा फटका थेट पोलिसांना बसत असल्याचे सांगितले जाते. सूत्रांच्या माहितीनुसार, पोलीस ठाण्याने नगरपालिकेकडे पत्रव्यवहार करून कंट्रोल रूम नगरपालिकेत हलविण्याची मागणीही केली आहे. दरम्यान, काम पूर्ण झाल्यानंतर ठेकेदाराला संपूर्ण रक्कम अदा करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे अंदाजपत्रकातील सर्व बाबींची अंमलबजावणी झाली होती का, कामाची गुणवत्ता तपासण्यात आली होती का आणि इतक्या मोठ्या प्रकल्पाची सहा महिन्यांत अशी अवस्था कशी झाली, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. आरोही प्रायव्हेट लिमिटेडचे प्रतिनिधी गंधार कोल्हेटकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

नागरिकांच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेली यंत्रणाच बंद पडत असल्याने करदात्यांच्या पैशांचा अपव्यय झाला का, याबाबत सखोल चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे. १ कोटी ४९ लाख रुपयांचा खर्च नेमका कुठे झाला आणि या कथित त्रुटींसाठी जबाबदार कोण? असा सवाल पेणकर विचारत आहेत.

## गुरांची अवैध वाहतूक रोखली

● चार गुरांसह पिकअप पोलिसांच्या ताब्यात




। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील कापडे गावाच्या हद्दीत गुरांची कथित अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर गोरक्षकांनी तत्परता दाखवत एक पिकअप वाहन अडविले. त्यानंतर चार गुरांसह वाहन पोलादपूर पोलीस ठाण्यात आणून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातून चार गुरे घेऊन जाणारी पिकअप (एमएच १३ सीई १९७६) कापडे गावाच्या हद्दीतून जात होती. या वाहनातून गुरांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती गोरक्षकांना मिळाल्यानंतर त्यांनी वाहनाची तपासणी केली. तपासणीदरम्यान वाहनात चार गुरे आढळून आली.

यानंतर गोरक्षकांनी वाहनासह गुरे पोलादपूर पोलीस ठाण्यात जमा केली. याप्रकरणी पोलिसांनी पुढील चौकशी सुरू केली असून, पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे अंमलदार अनुज शिंदे अधिक तपास करीत आहेत.

# गाळ उपशाच्या नावाखाली वाळू तस्करी?



■ महसूल विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह
■ शासनाचा लाखोंचा महसूल बुडाल्याची जोरदार चर्चा

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील सावित्री नदीपात्रात गाळ काढण्याच्या कामाच्या आडून केम्बुर्ली परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत वाळू उपसा सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, मागील दोन महिन्यांपासून नदीपात्रात सुरू असलेल्या या कथित प्रकारावर महसूल विभागाने एकही ठोस कारवाई न केल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. महाड शहर आणि परिसराला दरवर्षी पुराचा फटका बसत असल्याने राज्य शासनाने सावित्री, गांधारी, काळ, नागेश्वरी, मलिकार्जुन नद्या तसेच विविध नाल्यांमधील गाळ काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. मात्र या कामाचा गैरफायदा घेत काही ठिकाणी रेजगा काढण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वाळू उपसा केला जात असल्याची चर्चा सुरू आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रात्री उशिरापर्यंत जेसीबी, पोकलेन, ट्रॅक्टर आणि १० चाकी डंपरच्या सहाय्याने नदीपात्रातून उत्खनन सुरू असते. काही ठिकाणी ट्रॅक्टरवरच चाळणी बसवून गाळातून वाळू वेगळी केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. रेजगा काढण्याच्या नावाखाली प्रत्यक्षात वाळू बाजूला काढून तिची वाहतूक होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

या प्रकारामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असल्याची चर्चा असून, संबंधित वाळू उपशाची रॉयल्टी नेमकी भरली जाते का, असा सवाल उपस्थित होत आहे. महसूल विभाग, खनिकर्म विभाग आणि स्थानिक प्रशासनाला या प्रकाराची माहिती असूनही कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

जाणकारांच्या मते, नदीपात्रातील अनियंत्रित उत्खननामुळे भविष्यात नदीकाठांची धूप, भूजल पातळीवरील परिणाम आणि पूरस्थिती अधिक गंभीर होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे गाळ उपशाच्या कामाची आणि नदीपात्रातून बाहेर जाणाऱ्या साहित्याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. दरम्यान, केम्बुर्ली परिसरातील कथित अनधिकृत वाळू उपसा तात्काळ थांबवून संबंधित ठेकेदार, वाहतूकदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करावी, तसेच शासनाचा महसूल बुडाल्याच्या आरोपांची सखोल पडताळणी करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत केम्बुर्लीतील नदीपात्रातील कामांबाबत संशयाचे वातावरण कायम राहणार असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

# ‘टोरंट’ला आदिवासींचा प्रखर विरोध

**आमच्या जमिनींमध्ये घुसखोरी थांबवा; प्रकल्पाचे काम तात्काळ बंद करा**



। नेरळ । प्रतिनिधी ।

प्रस्तावित टोरंट एनर्जी पॉवर स्टोरेज सोल्युशन्स लिमिटेडच्या जलविद्युत प्रकल्पाविरोधात स्थानिक ग्रामस्थ, आदिवासी आणि धनगर समाजाचा रोष अधिकच तीव्र झाला असून, शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जनसुनावणीत ग्रामस्थांनी प्रकल्पाला जोरदार विरोध दर्शविला. आमच्या जमिनींवरील घुसखोरी थांबवा आणि प्रकल्पाचे काम तात्काळ बंद करा, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी मांडली.

पाली येथील महादेव मंदिरात आयोजित जनसुनावणीत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, गटविकास अधिकारी सुशांत पाटील तसेच टोरंट कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. कंपनीकडून प्रकल्पाचे सादरीकरण करत ऊर्जा निर्मिती आणि विकासासाठी प्रकल्पाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, स्थानिकांनी कंपनीच्या आश्वासनांवर अविश्वास व्यक्त करत तीव्र नाराजी नोंदविली.

प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या जमिनी, सर्व्हे क्रमांक, पूररेषा, संपादन प्रक्रिया, पुनर्वसन आणि नुकसानभरपाई याबाबत स्पष्ट माहिती देण्यात कंपनी अपयशी ठरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. अनेक प्रश्नांना समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने सभागृहात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या.

प्रकल्प क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आदिवासी आणि वनजमिनींचा समावेश असल्याने भविष्यातील सामाजिक व पर्यावरणीय परिणामांबाबतही गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. आदिवासी आणि धनगर समाजाच्या प्रतिनिधींनी आपल्या पारंपरिक उपजीविकेवर या प्रकल्पामुळे घाला येणार असल्याचे सांगितले. यावेळी आदिवासी महिला चिमाबाई पवार यांनी भावनिक शब्दांत आपली व्यथा मांडली. आमचे संपूर्ण जीवन या जमिनी आणि जंगलांवर अवलंबून आहे. करवंद, जांभूळ, मोहाची फुले, पळसाची पाने आणि इतर वनसंपत्तीवर आमचा उदरनिर्वाह चालतो. मात्र प्रकल्पाच्या कामासाठी यंत्रांच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर झाडांची तोड करण्यात आली आहे. आमच्या पिढ्यान्‌पिढ्या वास्तव्य असलेल्या जागांची नासधूस होत आहे, असे त्यांनी सांगितले.

### ब्लास्टिंगमुळे लोकवस्ती धोक्यात?

धरण उभारणीसाठी मोठ्या प्रमाणावर ब्लास्टिंग करण्यात येणार असल्याची माहिती सुनावणीत देण्यात आली. यावर ग्रामस्थांनी तीव्र आक्षेप घेत, अवघ्या ७०० मीटर अंतरावर होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे घरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणार असल्याचे सांगितले. घरांचे नुकसान झाले तर भरपाई मिळेल, असे सांगितले जाते. मात्र गरोदर महिला, वृद्ध नागरिक, लहान मुले आणि आजारी व्यक्तींच्या आरोग्याचे काय? असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला.

## सात वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

सात वर्षीय मुलीसोबत अश्लील चाळे केल्याप्रकरणी सुमेध नंदकिशोर घोक्षे (आकुर्ली) याच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. यातील सात वर्षीय पीडित मुलगी ही ३० मे रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास इमारतीच्या खाली खेळत असताना आरोपीने लपाछपी खेळण्याच्या बहाण्याने तिचा हात पकडला आणि तिच्यासोबत अश्लील चाळे केले.

# रायगडात आणखी एका इरशाळवाडीची चाहूल?

**बेकायदेशीर उत्खननामुळे भूस्खलनाचा धोका; खाणमाफियांपुढे प्रशासन हतबल?**

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील डोंगराळ भागात सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर बॉक्साईट उत्खननामुळे पर्यावरणाचा समतोल धोक्यात आला असून, आगामी पावसाळ्यात मोठ्या भूस्खलनाची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिकांच्या मते, डोंगरांची अनियंत्रित लचकेतोड सुरू असून, यामुळे इरशाळवाडी किंवा तळीयेसारख्या दुर्घटनांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पोकलन आणि जेसीबीच्या सहाय्याने अनेक ठिकाणी डोंगरांचे उतार धोकादायक पद्धतीने कापले जात आहेत. भूगर्भशास्त्र आणि खनिकर्म विभागाच्या नियमांनुसार आवश्यक असलेले सुरक्षित उतार आणि पायऱ्यांची रचना न ठेवता थेट उभे कडे तयार करण्यात आल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

याशिवाय उत्खननासाठी होत असलेल्या स्फोटांमुळे डोंगरांमध्ये मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याचे सांगितले जात आहे. पावसाळ्यात या भेगांमध्ये पाणी मुरल्यास डोंगरकडे कोसळून पायथ्याशी असलेल्या वाड्या-वस्त्यांवर संकट ओढवू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, डोळ्यांसमोर डोंगर पोखरले जात असतानाही महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि संबंधित यंत्रणा प्रभावी कारवाई करत नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. इरशाळवाडीसारख्या दुर्घटनेनंतर मोठमोठ्या घोषणा करण्यात आल्या होत्या. मात्र, आजही परिस्थिती बदललेली दिसत नसल्याने खाणमाफियांच्या वाढत्या प्रभावापुढे प्रशासन हतबल झाले आहे का, असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतर शोक व्यक्त करण्यापेक्षा ती टाळण्यासाठी आताच कारवाई करा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. संबंधित प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

## लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

४८ वर्षीय इसमाला ठार मारण्याच्या उद्देशाने लाथाबुक्क्याने जबर मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अनिता कातकरी यांचे चुलत मामा सासरे हे योगेश कातकरी याच्या मुलाच्या मोटारसायकलला आडवे गेल्याने तो मोटारसायकल स्लिप होऊन पडला आणि त्याला दुखापत झाली. या गोष्टीचा राग मनात धरून योगेश कातकरी आणि गणेश कातकरी यांनी ३१ मे रोजी ११ च्या सुमारास फिर्यादी यांचे चुलत मामा सासरे यांना तुला संपवून टाकतो असे बोलून जीवे ठार मारण्याचे उद्देशाने लाथाबुक्क्याने मारहाण केली आणि जोरात ढकलून दिले. त्यामुळे ते जमिनीवर पडून त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. या घटनेबाबतचा अधिक तपास पनवेल तालुका पोलीस करीत आहेत. आरोपींना कठोर शिक्षा करावी, अशी मागणी फिर्यादींकडून होत आहे.

पान १ वरून

## भीषण अपघातात एक ठार

जाणाऱ्या ट्रेलर क्रमांक एमएच १६ सीसी २९७९ याला पाठीमागून जोरात धडक दिली. या झालेल्या अपघातात जयपाल खोपटकर गंभीर जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झाला तर पिकअपमधील कृष्णा लक्ष्मण चिकाटी, काशिनाथ भानगोजी, कमलाकर लक्ष्मण चिकाटी, अविनाश रामदास गुंड हे चौघेजण गंभीर जखमी झाले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## रायगडात भीषण पाणीटंचाई

त्यामुळे पाणी पुरवठ्याच्या दीर्घकालीन उपाययोजनांऐवजी प्रशासन तात्पुरत्या मलमपट्टीवर भर देत असल्याची टीका होत आहे.

पेण तालुक्यात सर्वाधिक गंभीर परिस्थिती असून ९ गावे आणि ७६ वाड्यांतील २४ हजार ७४६ नागरिकांना १२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. महाडमध्ये २७ हजार ६२०, पनवेलमध्ये १८ हजार ५५३, तर कर्जत, खालापूर, माणगाव, पोलादपूर, म्हसळा आणि श्रीवर्धन तालुक्यांतील हजारो नागरिकांनाही टँकरच्या पाण्यावरच तहान भागवावी लागत आहे.

दरवर्षी उन्हाळा येतो, पाणीटंचाई निर्माण होते आणि प्रशासन टँकर सुरू करते, असेच चक्र कायम सुरू आहे. मात्र, कायमस्वरूपी जलस्रोत निर्माण करणे, जलजीवन मिशनची कामे पूर्ण करणे आणि गावागावांत नळाद्वारे नियमित पाणी पोहोचवणे या मूलभूत प्रश्नांवर ठोस उपाययोजना का होत नाहीत, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ग्रामीण भागातील अनेक महिलांना आजही पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असून टँकर कधी येणार याची वाट पाहण्यात दिवस जात आहेत. एका बाजूला ‘हर घर जल’च्या घोषणा केल्या जात असताना, दुसऱ्या बाजूला लाखाहून अधिक नागरिक टँकरवर अवलंबून असल्याचे वास्तव प्रशासनाच्या दाव्यांना छेद देणारे ठरत आहे.

जिल्हा प्रशासनाने आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली असली तरी नागरिकांचा प्रश्न वेगळाच आहे. ‘‘टँकर किती वाढवणार, पण कायमस्वरूपी पाणी कधी देणार?’’ असा संतप्त सवाल आता पाणीटंचाईग्रस्त भागातून विचारला जात आहे.रायगडमध्ये जलजीवन मिशनवर कोट्यवधी रुपये खर्च झाल्याचे सांगितले जाते. मात्र आजही हजारो कुटुंबांना टँकरच्या रांगेत उभे राहावे लागत असेल, तर या योजनांचा लाभ नेमका कुठे पोहोचला, याची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## आज सुरेश घरत यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

शिबीर घेतले जाणार आहे. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, लायन्स क्लब अलिबागचे अध्यक्ष प्रदीप नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, अलिबाग नगरपरिषदेचे जल व निचरा विभागाचे सभापती अनिल चोपडा आदी मान्यवरांच्या उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. शिबिराच्या सुरुवातीला शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांचा अभीष्टचिंतन सोहळा साजरा केला जाणार आहे. त्यानंतर रक्तदान व नेत्रचिकित्सा शिबिराचे उद्घाटन केले जाणार आहे. महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अश्रु ग्रंथी, तिरळेपणा या नेत्रविकारावर मोफत उपचार व शस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याची माहिती वरसोली येथील सुरेशकाका घरत मित्रमंडळाच्यावतीने देण्यात आली आहे.

## कायद्याचे रक्षकच आमनेसामने!

न्यायासाठी पोलीस ठाण्यात गेलेल्या वकिलालाच जर अशी वागणूक मिळत असेल, तर सामान्य नागरिकांची अवस्था काय असेल? असा सवाल आता विविध स्तरांतून उपस्थित केला जात आहे.

या घटनेची गंभीर दखल घेत उरण बार असोसिएशनने संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. बार असोसिएशनचे अध्यक्ष किशोर ठाकूर यांनी मुख्यमंत्री, गृहमंत्री तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार सादर करून निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

तपासासाठी खांदेश्वर पोलिसांकडे वर्ग केला आहे.

पीडित मुलगी व तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा तरुण दोघे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. याचा गैरफायदा घेत या तरुणाने पीडित मुलीला प्रेमात पाडून जवळीक साधली. त्यानंतर त्याने एप्रिल महिन्यात पीडित मुलगी घरामध्ये एकटी असल्याचा फायदा घेत तिच्याशी बळजबरीने शरीरसंबंध ठेवले. या अत्याचारामुळे पीडित मुलगी गरोदर राहिली. त्यामुळे पीडित मुलीच्या पोटात दुखू लागल्यानंतर पीडित मुलीच्या आईने तिला नेरूळ येथील महापालिकेच्या मीनाताई ठाकरे रुग्णालयात उपचारासाठी आणले असता, तपासणीत ती गरोदर असल्याचे समोर आले. त्यानंतर येथील डॉक्टरांनी या प्रकाराची माहिती नेरूळ पोलिसांना दिल्यानंतर नेरूळ पोलिसांनी या प्रकरणात पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून या तरुणाविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला, त्यानंतर घटनास्थळ खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याने त्यांनी हा गुन्हा खांदेश्वर पोलिसांकडे वर्ग केला. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी रायगड सज्ज

शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेण्यासाठी राज्याच्या विविध भागांतून शिवभक्त रायगडाकडे रवाना होऊ लागले आहेत. काही शिवप्रेमी गडावर दाखल झाले असून, अनेक जण आदल्या दिवसापासून रायगडावर पोहोचणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या प्रमाणात गर्दी होणार असल्याने रायगड पोलिसांनी सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेचे विशेष नियोजन केले आहे.

शिवभक्तांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा यासाठी महत्त्वाच्या मार्गांवर वाहतूक पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. शंभरहून अधिक एसटी बस तसेच खासगी वाहनांद्वारे शिवभक्त रायगडावर पोहोचणार असल्याने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महाड आणि माणगाव या दोन्ही बाजूंना स्वतंत्र वाहनतळ उभारण्यात आले आहेत. दुचाकी, चारचाकी आणि बस यांच्यासाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून त्यासाठी ६० हून अधिक वाहतूक पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील पोलीस दलासोबतच बाहेरील जिल्ह्यांतूनही अतिरिक्त पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला आहे. सीआरपीएफ जवान, शीघ्र कृती दल आणि अन्य सुरक्षा यंत्रणा गड परिसरासह महत्त्वाच्या ठिकाणी तैनात राहणार आहेत. लाखो शिवभक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, सध्या जाणवत असलेल्या तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागानेही विशेष खबरदारी घेतली आहे. उन्हाचा तडाखा, उष्माघात, चक्कर येणे, थकवा, निर्जलीकरण तसेच पाय घसरून होणाऱ्या किरकोळ दुखापतींची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा परिषद आरोग्य विभागाने गडावर आणि पायथ्याशी विशेष वैद्यकीय सेवा उभारल्या आहेत.

शिवराज्याभिषेक सोहळ्यादरम्यान दोन दिवसांसाठी एकूण १३ विशेष वैद्यकीय पथके कार्यरत राहणार आहेत. रायगड किल्ला आणि परिसरातील विविध महत्त्वाच्या ठिकाणी तात्पुरती वैद्यकीय मदत केंद्रे उभारण्यात येत असून, प्रशिक्षित डॉक्टर, परिचारिका, समुदाय आरोग्य अधिकारी आणि पॅरामेडिकल स्टाफ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास तात्काळ उपचार मिळावेत यासाठी गडाच्या पायथ्याशी आणि प्रमुख मार्गांवर २४ तास रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात येणार आहेत.

तसेच सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जीवनरक्षक औषधे, आवश्यक लसी आणि वैद्यकीय साहित्याचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. प्रत्येक वैद्यकीय केंद्रावर पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली असून, शिवभक्तांना आवश्यक आरोग्य सुविधा तत्काळ उपलब्ध होतील यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा, वाहतूक आणि आरोग्य व्यवस्थेचे त्रिस्तरीय नियोजन करण्यात आले असून, लाखो शिवभक्तांचा उत्सव सुरक्षित, शिस्तबद्ध आणि उत्साहात पार पडावा यासाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे.

## ‘गांजा विकणाऱ्या सूत्रधाराचा शोध घ्या’

। उरण । प्रतिनिधी ।

तालुक्यातील मुळेखंड-तेलीपाडा येथील जतीन महेश म्हात्रे (२९) या तरुणाला दि.३० मे रोजी पोलिसांनी उरण रेल्वे स्टेशन समोरील मोकळ्या मैदानात गांजा ओढताना रंगेहाथ पकडले. त्याच्यावर उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक संजय राठोड तपास करत आहेत. मात्र, या कारवाईनंतर नागरिकांमधून एकच सवाल उपस्थित होत आहे की, गांजा ओढणाऱ्या तरुणाला पकडले, परंतु हा गांजा उरणात आणतो कोण आणि विकतो कोण? केवळ सेवन करणाऱ्यांवर कारवाई करून हा प्रश्न सुटणार नाही. जोपर्यंत या अंमली पदार्थाचा पुरवठा करणाऱ्या मुख्य सूत्रधारांच्या मुसक्या आवळल्या जात नाहीत, तोपर्यंत तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकतच राहणार आहे. दरम्यान, उरण शहरात व ग्रामीण भागात गांजा सहज उपलब्ध होत असल्याची चर्चा आहे. स्टेशन परिसर, मोकळी मैदाने ही व्यसनी तरुणांचे अड्डे बनले आहेत.

**नोटीस**

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे काविर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक नविन नंदकुमार ठाकूर यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे काविर, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| काविर ता. अलिबाग | ३१६/१ | ०-७०-३० पो.ख. ०-११-४० एकुण ०-८१-६० | १६.२५ |
| | ३१७ | ०-२०-०० पो.ख. ०-००-०० एकूण ०-२०-०० | ५.१२ |

दिनांक : ०३/०६/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मारेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## गाव, पक्ष आणि माणसं जोडत राहिलेला प्रवास

# शेकाप निष्ठावंत सुरेश घरत

रायगड जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्ष आणि त्या पक्षातील नेत्यांची चर्चा जेव्हा रंगते, तेव्हा अनेक मोठी नावे समोर येतात. काही नावांनी विधानसभा गाजवली, काहींनी जिल्हा परिषद, काहींनी पंचायत समित्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधून आपली छाप उमटवली. पण शेकापची खरी ताकद नेहमीच पहिल्या फळीत उभी असलेल्या चेहऱ्यांमध्ये नसते. खेळाच्या भाषेत सांगायचे झाले, तर शेकापची खरी ताकद त्याच्या ''बेंच स्ट्रेंथ''मध्ये असते. कारण या पक्षात असे अनेक कार्यकर्ते आहेत, जे कधी मोठ्या पदावर पोहोचले नसतील, ज्यांच्या नावापुढे आमदार किंवा खासदार अशी बिरुदावली नसेल; पण पक्षाच्या विचारांचा झेंडा खांद्यावर घेऊन त्यांनी आयुष्याची अनेक वर्षे गावोगावी घालवली आहेत. पक्ष संकटात असताना उभे राहिले आणि पक्ष मजबूत असतानाही जमिनीवरच राहिले. त्यामुळे कधी कधी वाटते, शेकापमधील प्रत्येक कार्यकर्ता जणू विचारांची, निष्ठेची आणि संघर्षाची एखादी शिदोरी घेऊनच जन्माला आला असावा.

अशाच कार्यकर्त्यांपैकी एक नाव म्हणजे वरसोलीचे सुरेश घरत. आज ते अलिबाग तालुका चिटणीस आहेत. पण त्यांची खरी ओळख पदात नाही. त्यांची खरी ओळख आहे विश्वासात. सुरेश घरत यांची गोष्ट ही एखाद्या झपाट्याने उंचावलेल्या राजकीय कारकिर्दीची गोष्ट नाही. ती आहे वर्षानुवर्षे लोकांमध्ये राहून, विश्वास कमावत आणि नाती जपत केलेल्या प्रवासाची गोष्ट.

४ जून १९७०. वरसोलीतील एक सर्वसामान्य घर. तीन बहिणी, दोन भाऊ आणि त्यांच्यामध्ये वाढणारा एक मुलगा. कोणालाही त्या वेळी कल्पना नसावी की, पुढे हा मुलगा गावातील, तालुक्यातील आणि शेतकरी कामगार पक्षातील अनेक महत्त्वाच्या चर्चांचा भाग बनेल. १९९४ साल. राज्यात आणि देशात राजकारणाची वेगळीच हवा होती. काँग्रेसचा प्रभाव होता. सत्तेच्या जवळ जाण्याचे अनेक मार्ग खुले होते. अशा काळात बहुतेक जण राजकारणात संधी शोधतात. पण काही लोक राजकारणात विचार शोधतात. सुरेश घरत यांनी त्याच काळात शेतकरी कामगार पक्षाची वाट निवडली. हा निर्णय सोपा नव्हता. कारण शेकापमध्ये प्रवेश म्हणजे सत्तेच्या दालनात प्रवेश नव्हता. ती होती संघर्षाची वाट. पण काही माणसे पदाचा विचार करून पक्ष निवडत नाहीत; ती पक्षाचा विचार करून आपला मार्ग निवडतात. सुरेश घरत यांचा प्रवास अशाच लोकांपैकी एक आहे.

प्रत्येक कार्यकर्त्याच्या आयुष्यात एखादा प्रसंग असा येतो, जो त्याच्या राजकीय प्रवासाची दिशा ठरवतो. सुरेश घरत यांच्या बाबतीतही असा एक प्रसंग वारसोलीत घडला होता. त्या काळात वरसोलीत शेकाप आणि विरोधी गट यांच्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापलेले होते. एका कार्यक्रमानिमित्त शेकाप सरचिटणीस जयंत पाटील गावात आले होते. वातावरण तणावपूर्ण होते. दोन्ही बाजूंमध्ये बाचाबाची सुरू झाली होती. परिस्थिती पाहता अनेक कार्यकर्त्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला होता. काही जण मागे सरकत असल्याचेही दिसत होते. अशावेळी अनेक नेते गाडीत बसून निघून गेले असते आणि परिस्थिती शांत झाल्यावर पुन्हा आले असते. पण त्या दिवशी जयंत पाटील यांनी वेगळा निर्णय घेतला. ते जागेवरून हलले नाहीत. समोर तणाव होता, विरोध होता, अनिश्चितता होती; पण त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना सोडून जाणे पसंत केले नाही. उलट कार्यक्रम संपल्यानंतर ते गाडीतून निघून जाण्याऐवजी कार्यकर्त्यांसोबत चालत त्यांच्या घरापर्यंत गेले. त्यांच्या पाठीशी उभे राहिले. हा प्रसंग सुरेश घरत जवळून पाहत होते. त्या दिवशी त्यांनी केवळ एक नेता पाहिला नाही; तर त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसाठी उभा राहणारा नेता पाहिला. आपला नेता आपल्याला वाऱ्यावर सोडत नाही, ही भावना त्यांच्या मनात त्या दिवशी खोलवर रुजली. राजकारणात विचार महत्त्वाचे असतात, भाषणे महत्त्वाची असतात,













पण कार्यकर्त्यांच्या अडचणीच्या वेळी त्यांच्या पाठीशी उभे राहणे यापेक्षा मोठी गोष्ट नसते. त्या दिवशी सुरेश घरत यांना आपण योग्य ठिकाणी आहोत याची खात्री पटली. आणि कदाचित त्याच दिवशी त्यांनी मनाशी एक निर्णय घेतला की, जयंत भाईंसोबत आणि शेकापच्या विचारांसोबत कायम राहायचे. पुढची अनेक वर्षे त्यांनी ते कृतीतून सिद्ध केले. स्वतःच्या गावात अनेकदा

प्रतिकूल वातावरण होते. विरोधकांचे प्राबल्य होते. राजकीय गणिते वेगळी होती. तरीही त्यांनी पक्षाचा झेंडा खाली ठेवला नाही. उलट एक-एक कार्यकर्ता जोडत संघटना मजबूत करण्याचे काम सुरू ठेवले.

गावात राजकारण करणारे अनेक असतात. पण गावचा विचार करणारे फार कमी असतात. सुरेश घरत यांच्या प्रवासाकडे पाहताना एक गोष्ट लक्षात येते. त्यांनी पक्षाची कामे केली, संघटना वाढवली, निवडणुका लढवल्या; पण त्यांच्या चर्चेत नेहमी वरसोली हा विषय कायम राहिला. कारण त्यांच्यासाठी गाव हा राजकारणाचा विषय नव्हता. तो जबाबदारीचा विषय होता. येथील लोक त्यांना प्रेमाने काका म्हणून हाक मारतात. वरसोली जेट्टी असो वा कोळी समाजासाठी शेड, गावातील काँक्रीट रस्ते, पाणीपुरवठ्यासाठीच्या पाइपलाईन, कोळीवाड्यातील प्रश्न, तसेच

**विक्रांत वार्डे**

गणपती मंदिराची संरक्षक भिंत असो किंवा पोलीस स्टेशन आणि रुग्णालयाशी संबंधित प्रश्न असोत, प्रत्येक कामामागे एकच विचार होता की, गाव पुढे गेले पाहिजे. विशेष म्हणजे या कामांमध्ये त्यांनी कधी पक्षीय भिंती उभ्या केल्या नाहीत. आणि त्यामुळेच की काय ग्राम पंचायत वरसोलीमधील त्यांचे राजकीय विरोधक त्यांचे मित्र व सहकारी बनून एकत्रित गावाचे काम पूर्ण करतात. कारण सुरेशकाका लोकांना हे पटवून देण्यात यशस्वी ठरलेत की, गावाचा विकास हा कोणत्याही एका पक्षाचा नसतो; तो संपूर्ण गावाचा असतो.सुरेश घरत यांच्या कामाचा आढावा घेताना निसर्ग चक्रीवादळ आणि कोरोनाचा काळ टाळून चालणार नाही. रायगडने दोन्ही संकटे जवळून अनुभवली. एका बाजूला समुद्रकिनारी वसलेल्या गावांचे नुकसान झाले होते, तर दुसऱ्या बाजूला कोरोनाने जनजीवन विस्कळीत केले होते. अशा काळात अनेक जण घरात सुरक्षित होते; पण काही माणसे मात्र रस्त्यावर होती. वरसोलीतील कोळी बांधवांचे प्रश्न असोत, मदतीची गरज असलेली कुटुंबे असोत, प्रशासनाशी समन्वय साधण्याची वेळ असो किंवा रुग्णालयातील अडचणी असोत, सुरेश घरत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सातत्याने धावपळ केली. कोळी समाजाशी त्यांचे नाते हे केवळ राजकीय नाही. समुद्राशी रोज संघर्ष करणाऱ्या या समाजाच्या अडचणी त्यांनी जवळून पाहिल्या आहेत. म्हणूनच संकटाच्या काळात त्यांच्या मदतीसाठी पुढे उभे राहणे ही त्यांच्यासाठी जबाबदारी होती, उपकार नव्हते. कदाचित म्हणूनच आजही वरसोलीत अनेक जण विकासकामांपेक्षा आधी संकटाच्या काळात सोबत उभ्या राहिलेल्या काकाची ची? आठवण काढतात.

सुरेश घरत यांची आणखी एक ओळख म्हणजे कामगारांच्या प्रश्नांबाबतची त्यांची स्पष्ट भूमिका. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली किमान वेतनाचा प्रश्न असो, आरसीएफ परिसरातील कामगारांचे हक्क असोत किंवा स्थानिक युवकांना रोजगार मिळावा हा मुद्दा असो, त्यांनी नेहमीच कामगारांच्या बाजूने उभे राहण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही वेळा टीकाही झाली, काही हितसंबंध दुखावले गेले; मात्र, गोरगरिब कामगार जगला पाहिजे; या भूमिकेशी त्यांनी कधीही तडजोड केली नाही. स्थानिकांना रोजगार आणि कामगारांना न्याय, हा त्यांचा आजही कायम असलेला आग्रह आहे.सुरेश घरत यांच्याबद्दल बोलताना अनेक जण एक गोष्ट आवर्जून सांगतात की, ''काका फोन उचलतात''. ऐकायला हे साधं वाक्य वाटतं, पण आजच्या राजकारणात हीच गोष्ट अनेकदा दुर्मिळ ठरते. रक्तदान शिबीर असो, एखाद्या कुटुंबावर आलेले संकट असो, रुग्णालयातील अडचण असो किंवा एखाद्या तरुणाला मार्गदर्शनाची गरज असो, प्रयत्न करणारा एक माणूस आहे, हा विश्वास लोकांना असतो. म्हणूनच अनेकांसाठी ते नेते कमी आणि ''सुरेश काका'' अधिक आहेत.२०२५ मध्ये त्यांच्यावर अलिबाग तालुका चिटणीसपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. हे पद त्यांना एका दिवसात मिळाले नाही. त्यामागे तीन दशकांची पक्षनिष्ठा, शेकडो बैठका, असंख्य संघर्ष आणि कार्यकर्त्यांशी जपलेली नाती होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर दाखविलेला विश्वास होता. आणि म्हणूनच आज सुरेश घरत यांचा उल्लेख झाला की सर्वप्रथम त्यांचे पद आठवत नाही; आठवतो तो त्यांचा स्पष्टवक्तेपणा, पक्षावरील निष्ठा आणि माणसांशी जोडलेली त्यांची घट्ट नाळ. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, गौतम पाटील, प्रदीप नाईक यांच्यासह अलिबाग शहरातील सर्व नगरसेवक सहकारी यांच्यासमवेत ते पक्षाच्या माध्यमातून कधी स्मार्ट मीटर तर कधी रस्त्यासाठी आंदोलन करतात. तर कधी शेकापच्या जुन्या सहकाऱ्यांना भाईंसोबत जोडण्याचे काम करतात. पटकन रागवणे हा त्यांचा स्वभाव असला तरी शेकाप कार्यकर्त्याला त्रास झाला की, त्याला पहिला कॉल करून भेटायला जाणारा माणूस पण सुरेश घरतच असतो. शेतकरी कामगार पक्षाचा सुवर्णकाळ अनुभवलेले अनेक शिलेदार काळाच्या ओघात वेगवेगळ्या वाटांनी गेले. मात्र, आपल्या नेत्याला आणि आपल्या विचारांना कधीही एकटे सोडणार नाही; अशी भूमिका आजही ठामपणे मांडणाऱ्या मोजक्या कार्यकर्त्यांमध्ये सुरेश घरत यांचे नाव घेतले जाते. त्यामुळेच ते केवळ कार्यकर्ता म्हणून नव्हे, तर नव्या पिढीतील पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्थान म्हणूनही ओळखले जातात. कारण त्यांना एक गोष्ट पक्की माहीत आहे की, अंधार कितीही दाटला तरी सूर्य उगवणार हे निश्चित असते; फक्त योग्य वेळेची वाट पाहण्याची तयारी हवी.आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि जनसेवेच्या कार्यासाठी अखंड ऊर्जा लाभो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

*- अध्यक्ष, अलिबाग तालुका पुरोगामी युवक संघटना शेकाप*

# बेली पुलाकडे 'बांधकाम'ची पाठ; 'कांदळवन'कडे पुरावा

(पान १ वरुन)

अलिबाग-रेवदंडा मुख्य मार्गावरील बेली पूल दुरुस्तीच्या नावाखाली तब्बल वर्षभरापासून रखडला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उदासीन कारभाराचा फटका हजारो नागरिकांना बसत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने दुरुस्तीचा प्रस्ताव वर्षभरापूर्वीच कांदळवन विभागाकडे पाठविल्याचा दावा कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी केला आहे. परंतु, प्रत्यक्षात प्रस्ताव मार्चमध्ये पाठविला असून, सीआरझेडचा विषय असल्याचे त्यांच्या लक्षात होते, कांदळवन विभागाकडेही प्रस्ताव पाठवायचा असतो, हेही वेळीच लक्षात येणे गरजेचे होते. तरीही भविष्यातील धोका पाहता पूल तात्काळ होणे गरजेचे असल्याने कांदळवन विभागाने प्रस्ताव नागपूर कार्यालयाकडे पाठविला आहे. परंतु, यामध्ये काढण्यात आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे असून, त्यांनी ते पूर्ण न केल्यामुळे पुलाचे काम रखडल्याचा दावा अलिबाग तालुका कानंदळवन कक्ष अधिकारी कुलदीप पाटकर यांनी केला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हलगर्जीपणामुळे आजतागायत पुलाच्या कामाला मंजुरी मिळालेली नाही. परिणामी, नागरिक मात्र प्रशासनाच्या निष्क्रियतेचे बळी ठरत आहेत. विशेष म्हणजे, पूल अवजड वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे कारण देत एसटी बससेवा बंद ठेवण्यात आली आहे. मात्र, त्याच पुलावरून दिवसरात्र ३० ते ४० टन वजनाचे ट्रक सर्रास धावत आहेत. यावर कारवाई करणार कोण?

गेल्या वर्षभरापासून नागाव ते बेली परिसरातील शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तसेच नोकरीसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. रोजच्या अतिरिक्त प्रवास खर्चामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. विद्यार्थ्यांपासून नोकरदारांपर्यंत सर्वांनाच आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असताना, संबंधित विभाग मात्र फाईलींच्या ढिगाऱ्यात आणि पत्रव्यवहारात अडकलेले दिसत आहेत.

एक वर्ष उलटून गेले, तरी प्रशासनाला मंजुरी मिळवता आलेली नाही, काम सुरू करता आलेले नाही आणि नागरिकांना दिलासा देता आलेला नाही. विकासाच्या घोषणा करणाऱ्या यंत्रणांना एका पुलाच्या दुरुस्तीसाठी वर्षभर पुरेसा वेळ मिळत नसेल, तर सर्वसामान्यांनी कोणाकडे पाहायचे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने कांदळवन विभागाकडे बोट दाखवले असून, कांदळवन विभागाच्या परवानगीअभावी काम रखडल्याचे सांगितले आहे. मात्र, या विभागीय संघर्षात सामान्य नागरिक भरडले जात आहेत. प्रशासनातील समन्वयाच्या अभावाची किंमत जनता का मोजणार, असा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. कागदी घोडे नाचवून प्रश्न सुटत नाहीत; निर्णय घ्या आणि पूल सुरू करा, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत असून, बेली पुलाच्या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने ठोस भूमिका घ्यावी, अन्यथा जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.





> **बांधकाम विभागाचं लक्षच नाही**
> **सार्वजनिक बांधकाम विभागाशी यासंदर्भात मी याआधीच सूचना दिल्या आहेत की, या पुलावरुन अवजड वाहने जात असतील, तर बॅरिकेटिंग करुन घ्यावे, म्हणजे या पुलावर बॅरिअर लावा. आपण जर बॅरिअर लावले तर अवजड वाहने जाण्याचा प्रश्नच उरणार नाही. परंतु, अद्याप या सूचनेकडे लक्ष देण्यात आलेले नाही. आटीओलाही तपासणी करुन अवजड वाहनांवर कारवाई करण्याबाबत पत्र दिले आहे. प्रत्येक ठिकाणी पोलीस ठेवणे शक्य नाही. परंतु, सार्वजनिक बांधकाम विभाग लक्षच द्यायला तयार नाही.**
> **- सरिता चव्हाण, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक**

### मॅडम, पूल पडेपर्यंत पाठपुरावा सोडू नका!

बेली पूल अखेरची घटका मोजतेय. कधीही कोसळू शकतो, अशी अवस्था आज पुलाची झाली आहे. दगडी पिलर कोसळून पडले आहेत. लोखंडी सळ्या गंजून बाहेर आल्या आहेत. झाडांच्या मुळांनी पूल पोखरुन काढला आहे. परंतु, अद्याप परिस्थितीचे गांभीर्य नसलेल्या सार्वजनिक बांधमाक विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी याबाबत आम्ही प्रस्ताव पाठविला असून, पाठपुरावा सुरु आहे, असे सांगितले. नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत असून, पूल पडेपर्यंत आपण पाठपुरावा करणे सोडू नका, अशा प्रकार संताप व्यक्त केला आहे.

### विद्यार्थी, सर्वसामान्यांना आर्थिक भूर्दंड

सार्वजनिक बांधकाम विभागाने अलिबाग बस आगाराला या मार्गावरुन एसटी बसेस बंद करण्याबाबत पत्र दिले आहे. त्यामुळे वर्षभरापासून या मार्गावरुन एसटी बस बंद करण्यात आल्याचे आगार प्रमुख राकेश देवरे यांनी सांतिगतले. यामुळे शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अलिबागपर्यंत येण्यासाठी खासगी वाहनांनी प्रवास करावा लागत असून, आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. त्याचप्रमाणे नोकरदार, व्यापारी यांनाही आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

# उरणमध्ये 'मलिदा राज'चे साम्राज्य!

- **बेकायदेशीर व्यवसायांना अधिकाऱ्यांचे अभय?**
- **मलिद्यासाठी उरणकरांच्या जीवाशी खेळ**

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यात सध्या बेकायदेशीर व्यवसाय, भेसळयुक्त अन्नपदार्थ, नियमबाह्य पॅथॉलॉजी लॅब, निवासी भागातील बार-ढाबे, शासकीय जागांवरील अतिक्रमण आणि बनावट औषधांच्या व्यवहारांचा अक्षरशः स्फोट झाला आहे. या सर्व गैरप्रकारांच्या मुळाशी अन्न व औषध प्रशासन विभागातील काही भ्रष्ट अधिकारी असल्याचा संतप्त आरोप आता जनतेतून उघडपणे होऊ लागला आहे. काही अधिकारी महिन्याच्या लाखोंच्या मलिद्यासाठी उरणकरांच्या जीवाशी उघडपणे खेळ करत असल्याची खळबळजनक चर्चा आता रंगू लागली आहे.

उरणमध्ये आज परिस्थिती इतकी भयावह झाली आहे की, निवासी इमारती, सदनिका, गाळे आणि अगदी शासकीय जागांवरसुद्धा बार, रेस्टॉरंट, ढाबे, पॅथॉलॉजी, मेडिकल दुकाने आणि दवाखाने खुलेआम सुरू आहेत. ना योग्य परवानगी, ना अग्निसुरक्षा, ना आरोग्य विभागाची मंजुरी, ना पार्किंग व्यवस्था. तरीसुद्धा हे व्यवसाय राजरोसपणे सुरू आहेत. ''हप्ता द्या आणि धंदा चालवा'' हेच उरणमधील वास्तव बनले आहे का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत. विशेष म्हणजे, काही बार, ढाबे आणि खाद्य व्यवसाय थेट शासकीय जागांवर अतिक्रमण करून सुरू असल्याचे समोर आले आहे. अनेक निवासी भागांमध्ये रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या बार आणि ढाब्यांमुळे महिलांना, विद्यार्थ्यांना आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दारू पार्ट्या, धिंगाणा, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि संशयास्पद हालचालींमुळे अनेक भागातील नागरिक भयभीत झाले आहेत. मात्र, संबंधित अधिकारी कारवाई करण्याऐवजी ''मलिदा'' घेण्यातच व्यस्त असल्याचा गंभीर आरोप केला जात आहे.

उरणमध्ये सुरू असलेल्या या ''मलिदा राज''मुळे नागरिकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, ''जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या भेसळ माफियांना आणि त्यांना संरक्षण देणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना सरकार कधी लगाम लावणार?'' असा संतप्त सवाल आता प्रत्येक उरणकर विचारू लागला आहे. दरम्यान, आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेऊन उरणमधील अन्न व औषध प्रशासन विभागातील संबंधित अधिकारी, दलाल आणि बेकायदेशीर व्यवसायिकांच्या आर्थिक व्यवहारांची व मालमत्तेची सखोल चौकशी करावी, अशी जोरदार मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाने केली आहे.

### भेसळयुक्त अन्नाने आरोग्याचा खेळखंडोबा

उरणमधील अनेक हॉटेल, ढाबे, फास्टफूड सेंटर आणि चिकन-मटन दुकाने याठिकाणी निकृष्ट तेल, कुजके साहित्य, एक्सपायरी माल, रासायनिक रंग आणि दूषित पाण्याचा वापर होत असल्याच्या गंभीर तक्रारी आहेत. काही ठिकाणी झुरळे, उंदीर आणि घाणीच्या साम्राज्यातून नागरिकांना अन्न पुरवले जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. तरीही अन्न व औषध प्रशासन विभागाकडून कोणतीही मोठी धाड किंवा कारवाई होत नसल्याने ''मलिद्याच्या बदल्यात सर्व काही माफ'' अशी भावना उरणकरांमध्ये निर्माण झाली आहे.

### नियमबाह्य दवाखाने सुरू

उरणमध्ये अनेक पॅथॉलॉजी लॅब आणि दवाखाने नियमबाह्य पद्धतीने सुरू आहेत. काही ठिकाणी अपात्र कर्मचारी तपासण्या करत असून, रुग्णांच्या जीवाशी थेट खेळ सुरू आहे. निवासी सदनिकांमध्ये बेकायदेशीर दवाखाने चालवले जात असून, कोणत्याही सुरक्षेचे निकष पाळले जात नाहीत. तरीसुद्धा संबंधित विभागाकडून कोणतीही कठोर कारवाई होत नाही.

# आता श्वेतपत्रिका काढा

खूप वर्षांपूर्वी अंतुले मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात शेतकऱ्यांची पहिली कर्जमाफी करण्यात आली. ती राज्य पातळीवरची पहिली माफी होती. तिची रक्कम होती अवघी १०० कोटी रुपये. त्यावेळी त्या तेवढ्या रकमेतही शेतकऱ्यांची सर्व दुःखे दूर होतील असे अनेकांना वाटत होते. त्याच दरम्यान शरद पवारांनी शेतकरी दिंडी काढली होती व शरद जोशींची शेतकरी संघटना कांदा, ऊस अशा पिकांच्या रास्त भावासाठी आंदोलने करू लागली होती. आता शरद जोशी काळाच्या पडद्याआड गेले. कर्जमाफीच्या रकमा हजारो कोटी रुपयांपर्यंत पोचल्या. पण शेती व्यवस्थेचा आजार बरा न होता आता त्याचे असाध्य दुखण्यात रुपांतर झाले आहे. आता महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षांमधील तिसरी कर्जमाफी दाखल झाली आहे. त्यानुसार ५५ लाख ७२ हजार शेतकऱ्यांची ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जे माफ होणार आहेत. मनमोहनसिंग सरकारने २००८ मध्ये देशभरातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ७१ हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. आता २०२६ मध्ये त्याच्या निम्म्याहूनही अधिक रक्कम एकट्या महाराष्ट्रात कर्जे माफ करण्यासाठी खर्ची पडणार आहे. सध्या थेट जनता मतदान करेल अशा कोणत्याही निवडणुका नाहीत. तरीही राज्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली आहे. भाजपच्या सत्तेचा इतिहास पाहता हे थोडेसे अजबच आहे. अर्थात, हे सहजी घडलेले नाही. कर्जमाफीचे आश्वासन २०२४ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी देण्यात आले होते. लोकसभा निवडणुकीत दणका बसल्यामुळे जनतेला नाना आमिषे दाखवण्यात आली होती. त्यात एक होती लाडकी बहीण योजना. दुसरी ही कर्जमाफी. बहिणींचे पैसे निवडणुकीच्या आधीच सुरू झाले. त्यात कशी हजारो कोटींची भानगड झाली हे सध्या समोर आले आहेच. गंमत म्हणजे, जो शेतकरी धान्य पिकवून जनतेला जेवायला घालतो त्याचे कर्ज माफ करण्याबाबत मात्र टाळाटाळ सुरू होती. गेल्या वर्षी अखेर सर्वपक्षीय मोर्चा निघाला. त्यात राजू शेट्टींपासून ते डाव्या कम्युनिस्टांपर्यंत सर्व जण होते. बच्चू कडूंनी आंदोलन केले. शेतकऱ्यांच्या भावना तीव्र होत्या. शेवटी सरकारला कर्जमाफी जाहीर करावी लागली.

## विरोधकांच्या दबावामुळे

यामुळे या आश्वासनपूर्तीचे श्रेय देवेंद्रांच्या सरकारला नसून विरोधकांच्या दबावाला आहे. फडणवीसांना शक्य असते तर त्यांनी २०२९ च्या निवडणुकीच्या बरोबर आधी हा निर्णय घेतला असता. पण त्यांना ते जमले नाही. अर्थात गेल्या वर्षी आश्वासन देताना जिल्हा परिषद, नगरपालिका वगैरे निवडणुकीत फायदा होईल असा हिशेबही झालाच. पण तेव्हा तिजोरीत पैसे नव्हते. लाडकी बहीण योजनेसाठी आदिवासी खात्याचा किंवा महिला बालकल्याणचा निधी वळवा असे उद्योग चालू होते. त्याच्या विरोधात आदिवासी आमदारांनी एकत्र आवाजही उठवला होता. परिणामी मग आंदोलन थोपवण्यापूर्वी मग ३० जूनच्या आत माफीची घोषणा होईल असा वायदा करण्यात आला. मंगळवारी तो पूर्ण केला गेला. मुद्दल व व्याज मिळून दोन लाख रुपयांपर्यंत थकबाकी असेल तर ती कर्जे तात्काळ माफ होणार आहेत. थकबाकी दोन लाख रुपयांहून अधिक असेल तर वरची रक्कम आधी फेडावी लागेल व नंतरच माफी लागू होईल. विरोधकांनी यातील काही अटींना आक्षेप घेतला आहे व सरसकट कर्जमाफी व्हावी अशी मागणी केली आहे. पण बँकांचे आरोग्य नावाची काही चीज असते. ते राखायचे तर अशा अटी घालणे हे योग्यच आहे. यापूर्वीच्या कर्जमाफींमध्ये जमीन धारणेची अट होती व ती रास्त होती. आता ती काढून टाकण्यात आली आहे. याचा फायदा बडे बागायतदार व शेतकरी उठवतात हे यापूर्वीच्या सर्वेक्षणांमधून दिसून आले आहे. लोकप्रतिनिधी तसेच २५ हजारांवर पगार मिळवणारे कर्मचारी इत्यादींना शेतकरी म्हणून ही माफी घेता येणार नाही. यामध्ये कशा पळवाटा काढायच्या हे सर्वांना चांगले ठाऊक असते. यावर नियंत्रण ठेवण्यात सरकारी यंत्रणा कुचकामी असते हे वारंवार दिसले आहे. शिवाय, अपात्र लाडक्या बहिणींवर हसत हसत २१ हजार कोटी रुपये उधळणाऱ्या सरकारकडे तशी इच्छाशक्ती व नैतिक बळ आहे का हा कळीचा प्रश्न आहे. या कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळेल. येत्या खरीप हंगामात पाऊस कमी होण्याचा अंदाज असताना ही मदत विशेष उपयोगाची ठरेल. पण शेती व्यवस्थेच्या मूळच्या गंभीर आजारावर असल्या थातूरमातूर उपायांचा उपयोग होणारा नाही. तिथे मोठ्या शस्त्रक्रियेची किंवा मूलगामी उपायांची गरज आहे.

## आजार असाध्य झाला

आपल्या देशात शेती हा माणसांना जगवणारा आणि तगवणारा उपक्रम बनला आहे. आज शेती परवडत नसली तरीही सुमारे ५० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. म्हणजे शेतीतच काही ना काही रोजगार करून कसेबसे दिवस काढत आहेत. यामध्ये ना शेतकरी खूष आहे ना, शेतमजूर. आपली बहुसंख्य शेती ही कोरडवाहू आणि पावसावर अवलंबून आहे. १९७० मध्ये राज्यातील सरासरी जमीनधारणा दहा एकर होती. ती आता अडीच एकरांवर आली आहे. ७८ टक्के शेतकऱ्यांकडे जेमतेम चार एकर जमीन आहे. निव्वळ शेतीवर उदरनिर्वाह करणे अशक्य झाले आहे. हवामानाची अनिश्चितता वाढली आहेच. पण बाजारावर शेतकऱ्याचे कोणतेही नियंत्रण नाही. सध्या कोल्हापूर ते नागपूर सर्वत्र घेतल्या जाणाऱ्या सोयाबीन पिकाचे उदाहरण घ्या. २०२२ पासून गेल्या चार वर्षांमध्ये त्याचा क्विंटलचा सरासरी भाव चार ते पाच हजार रुपये राहिला आहे. तो वाढू लागला की, सरकार सोयाबीन तेलाच्या आयातीला परवानगी देते. भाव वाढू नयेत याची काळजी घेतली जाते. आपल्या देशातून परदेशात कपडा निर्यात करणाऱ्या तिरुपूर वगैरे ठिकाणच्या उद्योगपतींची मोठी लॉबी आहे. त्यांच्या दबावाखाली कापसाचे भाव वाढू दिले जात नाहीत. कांद्याचे उत्पादन प्रचंड झाले तरीही त्याच्या निर्यातीवर बंधने घालण्यात येतात, जेणेकरून देशांतर्गत बाजारात त्याचे भाव वाढू नयेत. नरेंद्र मोदी यांनी दुसऱ्या टर्ममध्ये डाळींच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन योजना जाहीर केली. ती आता गायब आहे. आंबा, संत्री, मोसंबी, द्राक्षे इत्यादी फळबागांचे शेतकऱ्यांना दर चारपैकी दोन वर्षांमध्ये हवामानाचा फटका बसतो. उरलेल्या वर्षांमध्ये पुरेसा दर मिळत नाही. या पार्श्वभूमीवर उत्पन्न देणारी शेतीव्यवस्था उभारणे हे खरे आव्हान आहे. दुर्दैवाने आपले कोणतेच पक्ष वा सरकारे त्याला भिडायला तयार नाहीत. कर्जमाफी देणे हा खरा उपाय नाही असे बोलण्याचे धाडस आपल्या पहिल्या कार्यकाळात देवेंद्र फडणवीसांनी केले होते. पण २०१७ मध्ये तेही अखेर या कर्जमाफीच्या राजकारणाला शरण गेले. या देशातील उद्योगपतींची लाखो कोटींची कर्जे माफ होत असताना शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या या माफीला विरोध करण्याचे कोणालाच कारण नाही. मात्र दुर्दैवाने त्यातून शेतकऱ्यांचे व शेतीचे भले होत नाही हे लक्षात घ्यायला हवे. आता खरे तर सरकारने या कर्जमाफीचा परिणाम काय झाला याची एक श्वेतपत्रिका काढायला हवी.

विचार

# काँग्रेसला धोक्याचा इशारा

***स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा तसेच लोकसभा निवडणुकीत मुद्दे वेगळे असतात. त्यांच्या निकालांचा एकमेकांशी थेट संबंध नसला तरी केरळसह अन्य ठिकाणी झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणूक निकालांमध्ये कमालीचे साम्य आहे. या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीला एक वर्ष राहिले असताना हिमाचल प्रदेश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपने मारलेली मुसंडी लक्षवेधी आहे.***



**राही भिडे**

भारतीय राजकारणात काही राज्यांचा स्वभाव ठरलेला असतो. दर पाच वर्षांनी सत्ता बदलणे हा जणू तिथल्या मतदारांचा अलिखित नियम बनून जातो. उत्तर भारतात या 'पॅटर्न'साठी राजस्थान आणि हिमाचल प्रदेश ही राज्ये विशेष ओळखली जातात. हिमाचल प्रदेशमध्ये सध्या काँग्रेसचे सुखविंदर सिंह सुक्खू यांचे सरकार असले, तरी नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल पाहता, काँग्रेसच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. भारतीय राजकारणात काही राज्यांची राजकीय संस्कृती वेगळी ओळख निर्माण करते. हिमाचल प्रदेश हे त्यापैकी एक महत्त्वाचे राज्य. येथे जवळपास दर पाच वर्षांनी सत्ता बदलते, अशी परंपरा गेल्या अनेक दशकांमध्ये दृढ झाली आहे. मतदार सत्ताधाऱ्यांना पुन्हा संधी देण्याऐवजी पर्यायाला पसंती देतात. त्यामुळे हिमाचलची निवडणूक केवळ सत्तेची लढाई नसते, तर जनमताचा स्पष्ट संदेश मानली जाते. अशा राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला बसलेला धक्का हा केवळ स्थानिक राजकारणापुरता मर्यादित नसून आगामी विधानसभा निवडणुकीचा इशारा मानला जात आहे. एकीकडे काँग्रेसने केरळमध्ये सत्ता पुन्हा मिळवली. तमिळनाडूमध्ये तब्बल ५९ वर्षांनंतर 'टीव्हीके'सोबत सत्तेत सहभागी होत दक्षिण भारतात आपले अस्तित्व टिकवून ठेवले; मात्र दुसरीकडे उत्तर भारतात, विशेषतः हिमाचल प्रदेशमध्ये पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे काँग्रेससमोरचा प्रश्न अधिक गंभीर ठरतो, तो म्हणजे दक्षिणेत मिळालेल्या यशाचे राष्ट्रीय पातळीवर रूपांतर करण्याची क्षमता पक्षात आहे का?

हिमाचल प्रदेशमधील पंचायत, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांकडे सामान्यतः स्थानिक प्रश्नांच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते; परंतु या निवडणुकांमधून ग्रामीण जनमताची दिशा स्पष्ट होत असते. या वेळी भारतीय जनता पक्षाने अनेक भागांमध्ये काँग्रेसला मागे टाकत संघटनात्मक ताकद दाखवून दिली. काँग्रेसच्या अपयशामागे काही ठळक कारणे दिसून येतात. पहिले म्हणजे पक्षातील गटबाजी. हिमाचल काँग्रेसमध्ये नेतृत्वाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहिला आहे. वीरभद्र सिंह यांच्या निधनानंतर पक्षाला एकमुखी नेतृत्व लाभले नाही. प्रदेशाध्यक्ष, माजी मुख्यमंत्री, केंद्रीय नेते आणि स्थानिक गट यांच्यातील मतभेद उघडपणे दिसून येतात. स्थानिक निवडणुकांमध्ये उमेदवारी वाटपापासून प्रचारापर्यंत या अंतर्गत संघर्षाचा फटका बसला. दुसरे म्हणजे भाजपची संघटनात्मक तयारी. हिमाचलमध्ये भाजपने ग्राम पातळीपर्यंत कार्यकर्त्यांचे जाळे मजबूत केले आहे. केंद्र सरकारच्या योजनांचा प्रचार, लाभार्थी वर्गाशी थेट संपर्क आणि संघ परिवाराची मदत यामुळे भाजपने ग्रामीण भागात पकड निर्माण केली. काँग्रेसकडे त्याला तोडीस तोड संघटनात्मक ताकद दिसली नाही. तिसरे कारण म्हणजे स्थानिक नेतृत्वावरील नाराजी. काँग्रेसने अनेक ठिकाणी जुन्याच चेहऱ्यांवर भर दिला. नव्या पिढीला संधी न दिल्याने तरुण मतदारांमध्ये उत्साह निर्माण झाला नाही. उलट भाजपने स्थानिक पातळीवर नवे नेतृत्व पुढे आणण्याचा प्रयत्न केला.

हिमाचल प्रदेशमधील मतदार अत्यंत सजग मानले जातात. राज्य लहान असले, तरी सामाजिक आणि राजकीय प्रश्नांबाबत येथे मोठी जागरूकता आहे. रोजगार, रस्ते, पर्यटन, शेती आणि सरकारी नोकऱ्या हे मुद्दे मतदारांच्या निर्णयाच्या केंद्रस्थानी असतात. स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये मतदारांनी काँग्रेसकडे पर्याय म्हणून पाहण्याची तयारी दाखवली नाही, हे या पक्षासाठी चिंतेचे कारण आहे. कारण विरोधी पक्ष म्हणून केंद्र सरकारविरोधातील नाराजीचा सर्वाधिक फायदा काँग्रेसला मिळणे अपेक्षित होते; पण तसे झाले नाही. याचा अर्थ असा, की भाजपविरोधी भावना अजूनही तीव्र स्वरूपात निर्माण झालेली नाही किंवा काँग्रेस स्वतःला विश्वासार्ह पर्याय म्हणून उभे करण्यात अपयशी ठरत आहे. स्थानिक निवडणुकांचे निकाल थेट विधानसभा निवडणुकीत रूपांतरित होतील, असे मानणे धाडसाचे ठरेल. हिमाचलमध्ये अनेकदा स्थानिक आणि विधानसभा निवडणुकांचे राजकीय गणित वेगळे असते, तरीही या निवडणुकांनी काही स्पष्ट संदेश दिले आहेत. काँग्रेससमोर नेतृत्वाचा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण हे स्पष्ट करावे लागेल. वीरभद्र सिंह यांच्या करिष्म्यानंतर काँग्रेसमध्ये निर्माण झालेली पोकळी अजून भरलेली नाही. नेतृत्वाबाबत स्पष्टता नसल्यास मतदार संभ्रमात राहतील.

भाजपकडे राष्ट्रीय नेतृत्वाचा मजबूत आधार आहे. काँग्रेसकडे मात्र स्थानिक पातळीवर एकजूट दिसत नाही. स्थानिक निवडणुकांमधील ठिकठाक यशामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह आहे. ग्रामीण भागातील मतदारांचा पाठिंबा कायम असल्याचा संदेश पक्षाला मिळाला. आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप 'डबल इंजिन सरकार'चा मुद्दा अधिक आक्रमकपणे मांडू शकतो. काँग्रेसमध्ये अंतर्गत संघर्ष कायम राहिल्यास विधानसभा निवडणुकीमध्ये त्याचा मोठा फटका बसू शकतो. हिमाचलसारख्या लहान राज्यात वैयक्तिक संबंध आणि स्थानिक समीकरणे निर्णायक ठरतात. एका मतदारसंघातील नाराजीचा प्रभाव संपूर्ण प्रदेशावर पडू शकतो. महागाई, बेरोजगारी आणि पर्यटन क्षेत्रातील मंदी हे मुद्दे काँग्रेससाठी संधी ठरू शकतात; परंतु त्यासाठी पक्षाने केवळ भाजपविरोधी प्रचार न करता ठोस पर्यायी कार्यक्रम मांडणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये काँग्रेसने ही आक्रमकता दाखवली नाही. हिमाचलमधील परिस्थिती केवळ एका राज्यापुरती मर्यादित नाही. ती काँग्रेसच्या राष्ट्रीय अवस्थेचे प्रतिबिंब आहे. केरळमध्ये विजय मिळवणे किंवा तमिळनाडूमध्ये सत्तेत सहभागी होणे ही सकारात्मक बाब असली, तरी उत्तर भारतात पक्षाला संघटनात्मक संकटाचा सामना करावा लागत आहे. उत्तर भारतातील राज्यांमध्ये काँग्रेसची परंपरागत मतपेढी ढासळत चालली आहे.

स्थानिक निवडणुकांमधील यश म्हणजे विधानसभा विजयाची हमी नाही. हिमाचलमध्ये सत्तांतराची परंपरा भाजपलाही लागू होते. राज्यातील सरकारी कर्मचारी, शेतकरी आणि तरुणांमध्ये नाराजी वाढल्यास परिस्थिती झपाट्याने बदलू शकते. विशेषतः बेरोजगारी आणि महागाई हे मुद्दे भाजपसाठी धोकादायक ठरू शकतात. पर्यटन उद्योगावर झालेले आर्थिक परिणाम आणि नैसर्गिक आपत्तींमुळे निर्माण झालेली अडचणही सरकारविरोधी वातावरण तयार करू शकते. त्यामुळे भाजपला केवळ संघटनात्मक बळावर विसंबून चालणार नाही. हिमाचल प्रदेशातील राजकारण दीर्घकाळ व्यक्तिमत्त्वकेंद्री राहिले. काँग्रेसमध्ये वीरभद्र सिंह तर भाजपमध्ये प्रेमकुमार धुमल यांच्यासारख्या नेत्यांचा प्रभाव होता. आता दोन्ही पक्ष नव्या नेतृत्वाच्या संक्रमणातून जात आहेत. अशा वेळी संघटनात्मक ताकद अधिक महत्त्वाची ठरत आहे. भाजपने राष्ट्रीय नेतृत्वाच्या आधारावर ही पोकळी काही प्रमाणात भरून काढली. काँग्रेस मात्र अजूनही व्यक्तिमत्त्वाभोवती राजकारण करताना दिसते. स्थानिक निवडणुकांमध्ये त्याचे परिणाम स्पष्टपणे दिसले. आगामी विधानसभा निवडणुकीत हिमाचलचा मतदार काही प्रमुख मुद्द्यांवर निर्णय घेण्याची शक्यता आहे. रोजगारनिर्मिती, सरकारी कर्मचाऱ्यांचे प्रश्न, पर्यटन आणि पायाभूत सुविधा, केंद्र-राज्य संबंध, स्थानिक नेतृत्वाची विश्वासार्हता आणि स्थिर सरकारची गरज हे मुद्दे महत्त्वाचे आहेत.

येत्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला हिमाचल प्रदेशमध्ये पुनरागमन करायचे असेल, तर भावनिक राजकारणापेक्षा व्यवहार्य राजकीय रणनीती स्वीकारावी लागेल. ग्रामीण भागात नव्याने संघटन उभारणे, युवा नेतृत्वाला संधी देणे आणि गटबाजीवर नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. हिमाचल प्रदेशमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील निकालांमुळे आगामी विधानसभा निवडणूक काँग्रेससाठी सोपी राहणार नाही, असे दिसते. दक्षिण भारतातील यशामुळे निर्माण झालेला आशावाद हिमाचलमध्ये दिसून येत नाही. उलट, पक्षातील विस्कळीतपणा आणि नेतृत्वाचा अभाव पुन्हा अधोरेखित झाला. तथापि, हिमाचलचे राजकारण शेवटच्या क्षणी कलाटणी घेणारे आहे. येथे मतदार कोणत्याही पक्षाला कायमस्वरूपी पाठिंबा देत नाहीत. त्यामुळे काँग्रेसकडे अजूनही संधी आहे; पण केवळ भाजपविरोधी नाराजीवर अवलंबून राहून चालणार नाही. संघटनात्मक पुनर्बांधणी, उत्तम नेतृत्व आणि स्थानिक प्रश्नांवर केंद्रित राजकारण या त्रिसूत्रीवर पक्षाला काम करावे लागेल. स्थानिक स्वराज्य निवडणुकांचे निकाल हे इशारे असतात, अंतिम निकाल नाहीत; पण त्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरते. हिमाचलमध्ये काँग्रेससमोर आज नेमके तेच आव्हान उभे आहे.

चर्चा आजची

# मान्सुन पूर्व कामांसाठी वीजेचा खेळ



**संतोष राऊळ**

जून महिना सुरू झाला असून, मान्सून कोणत्याही क्षणी दाखल होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी अवकाळी तसेच मान्सून पूर्व पावसाच्या सरी देखील बरसल्या. असे असले तरी उन्हाच्या झळा आणि उकाडा काही कमी होण्याचे नाव घेत नाही. त्यातच विजेचा वापर वाढल्याने अनेक भागांत विजेचा खेळ खंडोबा सुरू आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वेळोवेळी महावितरणकडून दुरूस्तीसाठी वीज पुरवठा बंद करण्यात येतो. कधीकधी दिवस दिवस वीज पुरवठा बंद केला जातो. तरी देखील भार वाढला किंवा इतर कोणत्याही कारणाने वारंवार वीज पुरवठा खंडीत होत आहे. त्यामुळे छोट्या मोठ्या व्यावसायिकांसह नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आताच हि परिस्थिती असेल तर पावसाळा चालू झाल्यावर काय होईल, अशी भीती नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

सध्या महावितरणकडून मान्सून पूर्व कामे प्रगतीपथावर सुरू आहेत. त्यासाठी आठवड्यातील एखाद्यावारी पुर्ण दिवसभर वीज पुरवठा खंडीत करून कामे केली जातात. त्याची पुर्वसुचना देखील सोशल मिडीयाद्वारे नागरिकांना दिली जाते. त्यासाठी महावितरणचे अधिकारी, कर्मचारी देखील मेहनत घेताना दिसत आहेत. पावसाळ्यात वीज ग्राहकांना वीजेबद्दलच्या कोणत्याही समस्या उद्भवू नये म्हणून मान्सून पूर्व कामे आटोपली जातात. मात्र, त्याचा फटका उन्हाळी सुट्ट्यांना बसला आहे. मार्च-एप्रिल महिन्यात विद्यार्थ्यांच्या परिक्षा संपल्यानंतर त्यांना सुट्ट्या जाहिर झाल्या. त्यांनतर विद्यार्थी आपल्या कुटुंबियांसह सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी जिल्ह्यातील पर्यटन स्थळी भेट दिली. यादरम्यान, अलिबाग तालुक्यासह जिल्ह्यातील इतर पर्यटन स्थळी पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी बऱ्याच पर्यटकांनी एक-दोन दिवसांसाठी हॉटेल्स, रिसॉर्ट आणि कॉटेजेसमध्ये रूम घेऊन राहिले होते. यंदाच्या मे महिन्यात उकाडा प्रचंड प्रमाणात वाढल्याने प्रत्येकाचा कल एसी रूमकडेच होता. एकाच वेळी असंख्य एसी, पंखे आणि मोठ्या प्रमाणात वीजेचा वापर झाल्याने वारंवार वीजेच्या समस्या उद्भवत होत्या. त्याचा मोठ्या प्रमाणात त्रास पर्यटकांसह स्थानिकांनाही झाला.

जिल्ह्यातील अनेक ठिकाणी आजही वीजेचा एकूण वापर आणि प्रत्यक्षात होणार पुरवठा यात मोठा फरक दिसून येत आहे. त्यासाठी कोणतीची खबरदारी महावितरणकडून घेतली जात नसल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. पर्यटन हंगाम हा पावसाळ्यातील चार महिने सोडले तर बाकीचे आठ महिने सुरू असतो. मात्र, एप्रिल-मे महिन्यात पर्यटकांची मोठ्या प्रमाणात रेलचेल सुरू असते. आणि या दिवसांत प्रचंड गर्मी असल्याने वीजेचा वापर देखील मोठ्या प्रमाणात वाढतो. याबाबत महावितरणला कल्पना असुनही त्यांच्याकडून कोणतीही उपाययोजना केली जात नाही. काही वर्षांपूर्वी कमी लोकवस्ती असल्यामुळे त्यावेळी बसविण्यात आलेले विद्युत रोहित्र आज त्याच्या दुप्पट लोकवस्ती वाढली तरी अधिक क्षमतेचे विद्युत रोहित्र बसविण्याची तसदी महावितरण कडून घेतील जात नसल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. उलट त्यासाठी वीज ग्राहकांनाच आंदोलन किंवा पैसे भरून नवीन विद्युत रोहित्र बसवावे लागत आहे.

त्यानंतरही अनेक समस्यांना वीज ग्राहकांना सामोरे जावे लागत आहे. पावसाळा दरवर्षीच येतो. तरीदेखील ऐन उन्हाळ्यात महावितरणकडून वीज संबंधित समस्यांच्या दुरूस्तीची कामे केली जातात. आठवड्यातील एखाद दिवस निवडून त्या दिवशी शक्य होईतील तेवढी कामे पुर्ण केली जातात. त्यामुळे महावितरण कर्मचाऱ्यांवरही एकदम भार वाढतो. तसेच, इतर दिवशीही काहीना काही कारणाने विद्युत पुरवठा खंडीत होत असतो. त्यामुळे व्यावसायिकांसह नागरिकांनाही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते.

सध्या महावितरणकडून मान्सूनपूर्व कामे प्रगतीपथावर सुरू आहेत. त्यामुळे येत्या पावसाळ्यात वीज समस्या भेडसावणार नाहीत, अशी अपेक्षा वीज ग्राहकांकडून वर्तविली जात आहे. परंतु, दरवर्षीचा पावसाळ्यातील अनुभव पाहता सोसाट्याचा वारा सुटल्यावर वीज पुरवठा खंडीत होतोच. त्यामुळे ऐन गर्मीच्या दिवसांत महावितरण कडून केलेली कामे व्यर्थच जातील. खरंतर मान्सुनपुर्व कामे करायलाच उशीरा सुरूवात करतात. त्यानंतर पावसाळ्यात उद्भवू शकणाऱ्या समस्या कळेपर्यंत पावसाळा देखील उजाडतो. यात महावितरणचंही नुकसान होतं आणि सामान्य नागरिकांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. दरवेळी यासाठी मोर्चे काढले जातात, पण त्याचा उपयोग शुन्य होतो. त्यामुळे यावर कायमचा तोडगा काढणं गरजेचं असल्याचे वीज ग्राहकांमधून बोलले जात आहे.

लोकसंसद

## केरळमचा १९ वर्षीय तहसीन कतार फुटबॉल संघात!

भारतीय फुटबॉल प्रेमींमध्ये हळूहळू फुटबॉलचा ज्वर वाढत चालला आहे. त्याचे कारण म्हणजे ११ जून ते १९ जुलै २०२६ या कालावधीत अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा या तीन देशांत संयुक्तपणे भरवली जाणारी २३वी फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धा! १९३० पासून आजतागायत जगातील एकूण ८० देशांनी किमान एकातरी विश्वचषकात सहभाग घेतला आहे. यांपैकी आठ देशांनी विश्वचषक जिंकलेला आहे. अर्थात भारत आजवर 'फिफा' या फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत एकदाही खेळलेला नाही. कारण भारतात क्रिकेटपुढे इतर खेळांप्रमाणेच अनेक कारणांमुळे फुटबॉल हा खेळ काहीसा मागेच आहे. मात्र असे असले तरी या क्रिकेटवेड्या देशात फुटबॉलचेही लाखो चाहते आहेत. सहा महिन्यांपूर्वी भारतात आलेल्या अर्जेंटिनाच्या जगप्रसिद्ध फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या देशभरात झालेल्या अभूतपूर्व स्वागताने ते दिसून आले होते. भारतातील केरळम, गोवा, पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातील मिझोरम, मणिपूर आणि मेघालय या राज्यांमध्ये फुटबॉल खेळ खोलवर रुजलेला आहे. विशेष म्हणजे यंदाच्या फिफा फुटबॉल स्पर्धेत भारतीय संघ नसला तरी भारतीय वंशाचा, मूळचा केरळमचा एक खेळाडू १९ वर्षीय तहसीन मोहम्मद जमशीद हा कतारच्या राष्ट्रीय फुटबॉल संघातून खेळणार आहे. प्रामुख्याने डाव्या बाजूने खेळणारा (लेफ्ट विंगर) तहसीन हा मैदानावरील एक वेगवान आणि अत्यंत लवचिक असा खेळाडू म्हणून ओळखला जातो. कतारच्या राष्ट्रीय फुटबॉल संघात त्याची निवड झाल्यामुळे केरळमच्या आणि संपूर्ण भारतीय फुटबॉल चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# महाराष्ट्राचा अभिमान पद्मश्री अशोक सराफ



मूळचे बेळगावचे असणाऱ्या अशोक सराफ यांचा जन्म मुंबईत झाला. दक्षिण मुंबईतील चिखलवाडी या भागात त्यांचे बालपण गेलं. गोपीनाथ सावकार हे त्यांचे मामा होते. अशोक सराफ यांचे शिक्षण मुंबईतील डी.जी.टी. विद्यालयात झाले. त्यांना सुरुवातीपासूनच नाटकांची अतिशय आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी शिरवाडकरांच्या ङ्गययाती आणि देवयानीफ या नाटकातील विदूषकाच्या भूमिकेद्वारा व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल ठेवलं. काही संगीत नाटकांतूनदेखील त्यांनी

भूमिका केल्या. त्यांची आजवरची लक्षात राहिलेली भूमिका म्हणजे अशीही बनवा बनवी या सिनेमातली धनंजय मानेची भूमिका आहे. तसंच पांडू हवालदार या सिनेमात त्यांनी दादा कोंडकेंसह अभिनय केला. तसंच राम राम गंगाराम या दोन चित्रपटांमध्ये दादा कोंडके यांच्यासह त्यांनी भूमिका केल्या. त्या दोन सिनेमांमधला अभिनयही लोकांच्या लक्षात आहे. नवरा माझा नवसाचा, बाळाचे बाप ब्रह्मचारी, अशी ही बनवा बनवी या चित्रपटांमधील अप्रतिम विनोद आणि अभिनयाने आपल्याला गोड आणि हसऱ्या आठवणी दिल्या आहेत. त्यामुळेच अजूनही अशोक मामांचे नाव घराघरात गाजतंय. ज्यांनी मराठी सिनेमाला हसवलं, रडवलं आणि हृदयाला भिडून ठेवले ते म्हणजे अशोक सराफ. ५० वर्षांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने त्यांनी सिनेमात राज केलाय! त्यांचा बेधडक विनोद, अप्रतिम अभिनय आणि प्रत्येक भूमिकेला जो न्याय दिला. अशोक सराफ म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीचं एक अमूल्य रत्न! आणि यावर्षी त्यांच्या कर्तुत्वाला सन्मान मिळाला तो पद्मश्री पुरस्काराने!!! २५ मे रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री देऊन अशोक सराफ यांचा गौरव करण्यात आला. अशोक मामांनी गेली कित्येक वर्षे मराठीतच नव्हे तर हिंदी सिनेसृष्टीत देखील आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. पद्मश्री हा सन्मान माझ्या जीवनातील एक अत्यंत विशेष क्षण आहे. महाराष्ट्र शासनाचे, माझ्या कुटुंबाचे, सहकलाकारांचे आणि प्रेक्षकांचे मी आभार मानतो. तुमच्या प्रेमाशिवाय हे शक्य झालं नसतं. तुमचं प्रेम आणि आशीर्वाद कायम असेच राहू द्या! असे अशोक सराफ म्हणाले. या ऐतिहासिक क्षणी, त्यांचं कौतुक करणाऱ्या त्यांच्या पत्नी, अभिनेत्री निवेदिता सराफ आणि कुटुंबिय देखील उपस्थित होते. मराठी कलाविश्वात अशोक सराफ यांच्या वनोदी अभिनयाने अनेक पिढ्यांना हसवले आहे. त्यांचे अचूक विनोदी टायमिंग आणि अभिनयाची वेगळी छाप आजही लोकांच्या मनात ताजी आहे! आपल्या चेहऱ्यावरील विनोदी हावभावाच्या जोरावर आणि आपल्या परिपूर्ण अभिनयाने मराठी चित्रपट सृष्टीवर तब्बल चार दशकांहून अधिक काळ विनोदी चित्रपट अभिनेते म्हणून विनोदी अभिनेते अशोक सराफ यांनी राज्य केल.

# म्हसळा शहराचे प्रवेशद्वार बकाल

**● महत्त्वाच्या ठिकाणी मूलभूत सुविधांचा अभाव ● पावसाळ्यापूर्वी उपाययोजना करण्याची मागणी**

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्याची मुख्य बाजारपेठ आणि शहराचे प्रवेशद्वार म्हणून ओळखला जाणारा राजे छत्रपती शिवाजी महाराज चौक- दिघी नाका सध्या प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे समस्यांच्या विळख्यात सापडल्याचे चित्र दिसून येत आहे. तालुक्यातील सर्वाधिक वर्दळीच्या या चौकातील विकासकामांकडे संबंधित यंत्रणांनी पाठ फिरवल्याची चर्चा नागरिक करत आहे. दिघी नाका हा तालुक्याचा स्वागत चौक मानला जातो. चौकाला लागून एसटी स्थानक, ग्रामीण रुग्णालय, रिक्षा व मिनिडोर स्थानक तसेच विविध व्यावसायिक आस्थापना असल्याने येथे चोवीस तास नागरिकांची वर्दळ असते. याच परिसरात नव्याने तालुका पोलीस ठाण्याचे भव्य प्रशासकीय संकुलही उभारले जाणार आहे. मात्र, अशा महत्त्वाच्या ठिकाणी मूलभूत सुविधांचाच अभाव असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. चौकातील मुख्य हमरस्ता सध्या खड्ड्यांनी विद्रूप झाला आहे. गेल्या दोन वर्षांपासून त्याच्या दुरुस्तीकडे नगर पंचायत तसेच संबंधित शासकीय विभागांचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. पावसाळा तोंडावर आला असताना या खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी, अपघात आणि पादचाऱ्यांना होणारा त्रास वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले यांच्या कार्यकाळात उभारण्यात आलेली सार्वजनिक पाणपोई आजही नागरिकांच्या सेवेत आहे. मात्र, या पाणपोई समोर झालेल्या कथित अतिक्रमणामुळे परिसराचा मोकळेपणा हरवत चालल्याचे चित्र आहे. परप्रांतीय व्यावसायिकांनी अतिक्रमण करून येथे व्यवसाय थाटला आहे. याबाबत नगर पंचायत कोणतीही ठोस कारवाई करत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. याशिवाय गटारांवर अतिक्रमण, रस्त्यालगत उभारलेल्या झोपड्या, टाकून दिलेल्या जुन्या हातगाड्या आणि अनधिकृत व्यावसायिक अडथळ्यांमुळे चौकाची शोभा कमी झाली असून शहराच्या सौंदर्यालाच गालबोट लागले आहे. तालुक्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या चौकाची अवस्था पाहून बाहेरून येणाऱ्या नागरिकांमध्येही नकारात्मक संदेश जात असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.




**चौकाचे नामकरण करा**

पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती, अतिक्रमण हटविणे, वाहतूक व्यवस्थेची सुधारणा आणि चौकाचे सुशोभीकरण करून चौकाचे नामकरण करण्यात यावे अशी मागणी आता नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

---

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

४ जून

१)रामचंद्र वामन पाटील, मु.कुरूळ, अलिबाग,४-६-१९५५

२) श्री.सुभाष नारायण म्हात्रे भुते, अलिबाग, ४-६-१९५७

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

---

## विविध वाणांचे बियाणे विक्रीसाठी उपलब्ध

**पोलादपूर :** तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने मुबलक बियाणे विक्रीसाठी उपलब्ध असल्याने खरेदीचे आवाहन केले आहे. काही दिवसांपूर्वी तालुक्यातील शेतकऱ्यांना विविध वाणाचे बियाणे व युरिया खतांचे मोफत वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित नसलेल्या शेतकऱ्यांना हे आवाहन करण्यात आले आहे. सध्या खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये तालुक्यामध्ये कृषी सेवा केंद्रामध्ये भात पिकाच्या विविध वाणांचे व कंपन्यांचे मुबलक बियाणे विक्रीसाठी उपलब्ध आहे. तसेच सद्या तालुक्यामध्ये कृषि सेवा केंद्रांमध्ये २५० टन युरिया खत उपलब्ध आहे. तसेच यापुढे देखील खत पुरवठा होणार आहे. खते व बियाणे कृषी सेवा केंद्रामधुन खरेदी करताना आधारकार्ड व मोबाईल नंबर द्यावेत. बियाणे खरेदी करताना खरेदीचे पक्के बिल दुकानदाराकडून घ्यावे व सदर बिल खरीप हंगामामध्ये जतन करुन ठेवावे. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी केले आहे.

---



## अंबर्लेत शिवविचार अभियानाचा जागर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव येथील अंबर्ले मंडळाच्या वतीने रविवारी (दि. ३१) मे रोजी दुर्गामाता मंदिरात हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले. अंबर्ले, न्हावे, मांगरूळ, वाघोसे, खडकोली, पनवेल बुद्रुक, पनवेल खुर्द, वडाचा कोंड, कातळाचा कोंड आदी गावांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या संमेलनास सुमारे १५० हिंदू बांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भक्तीमय भजन संध्येने झाली. स्थानिक भजनी मंडळे व युवकांनी सादर केलेल्या अभंग, भक्तीगीत आणि विठ्ठल नामस्मरणामुळे संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला. सचिन करडे यांनी हिंदुत्व आणि शिवविचार या विषयांवर प्रभावी मार्गदर्शन केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते प्रत्यक्ष जीवनात आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी दिशा वारखंडकर यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांचे 'पसायदान' सादर केले.

---

## चिरनेरमध्ये महागणपतीच्या दर्शनासाठी रांगा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

तीर्थक्षेत्र चिरनेर नगरीत बुधवारी (दि.३) संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने भाविकांनी महागणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच, रांगा लावून, आपल्या आराध्य देवतेचे दर्शन घेतले. यावेळी श्रींच्या तीर्थस्थानात भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले होते. रायगड, नवी मुंबईसह हजारोंच्या संख्येने भाविक दाखल झाले होते.



मंदिराचा गाभारा फुलांच्या माळांनी सजविण्यात आला होता. विशेषता छोट्या-मोठ्या व्यवसायिकांचा व्यवसाय तेजीत होता. परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती. शोभिवंत वस्तूंची दुकाने, हॉटेल, नारळ, हार, फुले, मातीची भांडी, पापड, कडधान्य विक्रेत्यांबरोबर प्रसाद व पेढेवाले सुखावले होते. आंबे, जांभळे, करवंदे, कंदमुळे, विविध जातीच्या रानभाज्या व फळे अशा रानमेव्याला तर मोठी मागणी होत असताना दिसत होती. रानमेवा घेऊन अनेक आदिवासी व आगरी समाजाच्या महिला विक्रेत्या विक्री करताना दिसून आल्या. त्यामुळे महागणपती मंदिर परिसरात मोठी वर्दळ दिसून आली. विशेषता मंदिरात येणारे भाविक येथून आवर्जून हा ग्रामीण रानमेवा खरेदी करताना दिसत होते.चिरनेर येथील महागणपतीचे तीर्थस्थान हे पेशवेकालीन असल्याचा दाखला मिळत असला, तरी गणेश मंदिर हे पेशवेकालीन असून महागणपतीची मूर्ती ही अत्यंत पुरातन असल्याचे दिसून येते. भाविकांच्या सोयीसाठी श्री गणपती देवस्थानतर्फे चोख व्यवस्था करत, गर्दीचे सुरळीत नियोजन करण्यात आले होते.

---

## माथेरानमध्ये नितीन शहा यांचा सत्कार

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये धनगर समाजाचे वतीने आहिल्याबाई होळकर जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने माथेरान शहरात अहिल्याबाई होळकर चौक येथे अभिवादन करण्यात आले. समाजसेवेतील त्यांचे योगदान, जनसामान्यांच्या प्रश्नांबाबतची संवेदनशीलता आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये घेतलेला सक्रिय सहभाग याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. सामाजिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करून समजहित जपणारे नितीन शहा यांना नुकताच अहिल्यादेवी होळकर सामाजिक गौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. या प्रसंगी विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार प्रदान समारंभात नितीन शहा यांचा सत्कार करण्यात आला. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या चरणी प्रार्थना व्यक्त करण्यात आली. या सन्मानाबद्दल विविध स्तरातून नितीन शहा यांच्यावर



---

## एमबीए सीईटी परीक्षेत मंथनला यश

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षातर्फे (सीईटी कक्ष) एप्रिल, २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आणि मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अभ्यासक्रमाच्या पहिल्या संधीच्या सीईटी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या परीक्षेत नागोठण्याजवळील वांगणी येथील मंथन ठाकूर याने उज्वल यश संपादन केले आहे. मंथन याने पहिल्याच प्रयत्नात ९०.०४ टक्के गुण मिळवले. मंथन याने यापूर्वी लोणेरे - माणगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्निकल युनिव्हर्सिटी (बाटू) मधून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन या शाखेतून अभियांत्रिकी पदवी मिळविली असून त्याने काही काळ नोकरीही केली आहे. मात्र, त्याला बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन क्षेत्रात असलेल्या आवडीमुळे त्याने एमबीए सीईटी परीक्षा देण्याचे ठरविले आणि त्याने पहिल्याच प्रयत्न ही परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण केली आहे. त्यांचा यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



---




## चंद्रशेखर जुईकर सेवानिवृत

**। नेरळ। प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेने आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित केलेले चंद्रशेखर जुईकर हे शिक्षक सेवेतून निवृत झाले. मुख्याध्यापक पदावर सेवानिवृत झालेले चंद्रशेखर जुईकर यांचा सेवानिवृत्त सोहळा कर्जत तालुक्यात चार ठिकाणी साजरा करण्यात आले. जुईकर यांनी शिक्षक सेवेची सुरुवात मार्च १९८९ मध्ये आत्रांड-निड येथील जिल्हा परिषद शाळेतून झाली. पुढे पदवीधर शिक्षक म्हणून शेलू येथे शिक्षक म्हणून रुजू झाले. त्यानंतर कोल्हारे येथे, पिंपळोलीमध्ये कोल्हारेमध्ये सेवा करण्यात आली. प्रमोशन झाल्यानंतर केंद्रप्रमुख म्हणून भोईरवाडी आणि बेकरे शाळा येथे कार्य पाहिले. त्यांच्या पत्नी वनिता चंद्रशेखर जुईकर या पदवीधर असून मुलगा प्रतिक जुईकर हे आयएएस आहे. आपल्या वडिलांचे या कौतुक सोहळ्याला प्रतिक जुईकर उपस्थित होते.

---

## 'सिग्नलची शाळा' उपक्रमाचा संकल्प

**। उरण । प्रतिनिधी ।**

दिवंगत प्रशांत पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी सिग्नलवरच्या मुलांसाठी शाळा हा सामाजिक उपक्रम सुरू करण्याचा संकल्प जाहीर केला आहे. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या सिग्नलवरील मुलांना साक्षरतेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे. या उपक्रमाअंतर्गत सिग्नलवर भीक मागणारी, फुले विकणारी किंवा इतर कामे करणाऱ्या मुलांना लिहिणे, वाचणे, स्वतःची सही करणे याचे प्राथमिक शिक्षण दिले जाणार आहे. तसेच लहान मुलींना गुड टच-बॅड टचबाबत जागृती करून त्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात मार्गदर्शन केले जाणार आहे.



दिवंगत प्रशांत पाटील यांनी आयुष्यभर समाजहिताची जपलेली भूमिका आणि सर्वसामान्यांप्रती असलेली बांधिलकीच्या प्रेरणेतून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाचा प्रकाश पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या उपक्रमामुळे सिग्नलवरील वंचित मुलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून त्यांना शिक्षणाची नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी नाहिदा ठाकूर, प्रार्थना म्हात्रे, नाना नलावडे, चेतन म्हात्रे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत वंचित मुलांच्या भवितव्यासाठी उचललेले हे पाऊल समाजात सकारात्मक संदेश देणारे ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

---

**खिशाला परवडणाऱ्या दरात सेवा प्रवाशांचा प्रवास अत्यंत आनंददायी**

# बागमांडला फेरीबोटला पर्यटकांचा प्रतिसाद

**। पाली । प्रतिनिधी ।**

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना जलमार्गाने जोडणाऱ्या वेश्वी-बागमांडला फेरीबोट सेवेला सध्या प्रवाशांची आणि पर्यटकांची प्रचंड पसंती मिळताना दिसत आहे. उन्हाळी सुट्ट्यांचा काळ असल्याने अनेक पर्यटक रायगडमधील विविध पर्यटन स्थळांना भेटी देऊन या फेरीबोटने रत्नागिरी जिल्ह्यात प्रवेश करत आहेत, तर काही पर्यटक रत्नागिरीवरून रायगड मार्गे मुंबई-पुण्याच्या दिशेने प्रवास करत आहेत. अतिशय कमी वेळात आणि खिशाला परवडणाऱ्या दरामध्ये ही सेवा गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे. मागील अनेक वर्षांपासून या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या खाडीवरील पुलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे पर्यटक स्थानिक नागरिक, व्यावसायिक आणि प्रवाशांना या फेरीबोटचाच मोठा आधार मिळत आहे. प्रवाशांचा हा प्रवास अत्यंत आनंददायी आणि उत्साहाचा ठरत आहे.



ही महत्त्वपूर्ण फेरीबोट सेवा सुवर्णदुर्ग शिपिंग अँड मरीन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड द्वारे २००७मध्ये सुरू करण्यात आली. बाणकोट खाडीवर रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील बाणकोट आणि रायगड जिल्ह्यातील बागमांडला दरम्यान धावणाऱ्या या फेरीबोटने प्रवाशांचा वेळ आणि श्रम दोन्ही वाचत आहेत. या आधुनिक फेरीबोटची क्षमता मोठी असून, यामधून प्रवाशांसोबतच दुचाकी, चारचाकी, टेम्पो, बस आणि अगदी प्राण्यांचीही सुरक्षित वाहतूक केली जाते. यामुळे पर्यटकांना स्वतः च्या वाहनासह प्रवास करणे अत्यंत सोपे झाले आहे. अवघ्या दहा ते पंधरा मिनिटांमध्ये एका किनाऱ्यावर दुसरे किनाऱ्यावर पोहचता येते. विशेष म्हणजे बाराही महिने ही सेवा उपलब्ध असून रात्री दहा वाजेपर्यंत प्रवास करता येतो. रत्नागिरी पर्यटन या फेरीबोट सेवेमुळे दोन्ही जिल्ह्यांतील पर्यटन स्थळांची साखळी जोडली गेली आहे.

> **"आम्ही या फेरीबोटद्वारे सहकुटुंब प्रवास केला. अतिशय कमी वेळेत आणि कमी पैशात आम्हाला स्वतःची गाडी घेऊन खाडी पार करता आली. यामुळे आमचा प्रवासाचा थकवा वाचला आणि दोन्ही जिल्ह्यांतील निसर्गरम्य पर्यटन स्थळांचा मनसोक्त आनंद घेतला आहे."**
>
> **-नम्रता सुर्वे, पर्यटक.**

---

## निवडक

### माणगाव एस. टी.चा वर्धापन दिन



**म्हसळा :** माणगाव एस. टी. आगाराचा ७८ वा वर्धापन दिन केक कापून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी आगार कर्मचाऱ्यांतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रवींद्र लाड यांच्या हस्ते केक कापून वर्धापन दिनाची सुरुवात करण्यात आली. आगार प्रमुख छाया कोळी यांनी रविंद्र लाड यांचे पुष्प देऊन स्वागत केले. याप्रसंगी वाहतूक निरीक्षक सर्वेश मोरे, तुकाराम हाटे, रविंद्र वाढवळ, लक्ष्मण पांचाळ, रोहिणी तेलंगे, संगीता सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी लाड रविंद्र यांनी सांगितले की, शासनाचे या खात्याकडे दुर्लक्ष केले असले तरी कर्मचाऱ्यांमुळे एस. टी. अजून जिवंत आहे. एस. टी. ही गोरगरिबांच्या जीवनातील दळणवळणाचे मुख्य साधन असून खेडोपाड्यातील लोकांचे जीवन केवळ आणि केवळ एस. टी. वरच अवलंबून आहे असे यांनी सांगितले.

### सम्यक जाधवची भारतीय सैन्य दलात निवड



**तळा :** गायमुख (पन्हेळी) बौद्धवाडी येथील सम्यक जाधव याची वयाच्या २० व्या वर्षी भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे. त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पन्हेळी येथे झाले असून उच्च शिक्षण द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथे झाले. सम्यक कला शाखेची पदवी उत्तीर्ण असून तो मागील तीन वर्षांपासून कमांडो अकॅडमी सातारा येथे सैनिकी शिक्षण घेत होता. या कालावधीत त्यांनी मैदानी प्रशिक्षण घेत असतानाच लेखी परीक्षेचा अभ्यास केला. लहानपणापासून देश सेवा करण्याची ईच्छा असलेल्या सम्यकने आपल्या अथक मेहनतीने हे यश पहिल्याच प्रयत्नात संपादन केले. त्याचे वडील भिमराज जाधव यांची १९९७ मध्ये भारतीय सैन्य दलात जाण्याची ईच्छा अपूर्ण राहिली होती, ती ईच्छा आपल्या मुलाने पूर्ण केल्याने त्याच्या आई वडिलांना खूप आनंद झाला आहे. त्याचेवर नातेवाईक, गुरुजन, मित्रपरिवारांकडून या निवडीबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यात त्याच्याकडून देशाची सेवा उत्तम प्रकारे घडेल यासाठी सर्वांनी त्याला शुभेच्छा दिल्या.

### वावोशीत अहिल्याबाईंची जयंती साजरी



**वावोशी :** खालापूर तालुक्यातील वावोशी (मल्हारनगर) येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या जयंतीनिमित्त नामसप्ताह, प्रतिमा पूजन व सत्कार समारंभ तसेच संगीत भजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज, मल्हारराव होळकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमिला पाटील, राजू शहासने, महेश पाटील, अनंत हिरवे, जतिन मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी अहिल्याबाई होळकरांच्या लोककल्याणकारी, न्यायप्रिय आणि समाजोन्नतीच्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. या कार्यक्रमाचे आयोजन सुरेश गोरे, किसन गोरे, रामचंद्र बर्गे, मालू ढेबे, लक्ष्मण ढेबे, राया ढेबे, विजय ढेबे, अजय ढेबे, भगवान ढेबे, बाबू ढेबे, संभाजी ठोंबरे तसेच जय मल्हार मित्र मंडळ आणि अहिल्या महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

### शिहुत हृदय तपासणी शिबिराला प्रतिसाद



**सुकेळी :** डॉ. पुरुषोत्तम भोईर यांचे वडील दामोदर हरी भोईर यांच्या ७० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून डॉ. भोईर क्लिनिक व शुश्रुषा हार्ट केअर सेंटर स्पेशालिटी हॉस्पिटल नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विभागातील नागरीकांसाठी मोफत हृदय तपासणी शिबिराचे आयोजन सोमवारी (दि.१) जुन रोजी करण्यात आले होते. या शिबिराला नागरीकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या शिबिराचे उद्घाटन डॉ. रोहीदास शेळके, डॉ. सुनिल पाटील, डॉ. सुधीर पाटील, डॉ. अभिषेक शहासने, डॉ. कविता कदम, डॉ. पुरुषोत्तम भोईर, डॉ. प्रिया भोईर, दामोदर भोईर, लक्ष्मण खाडे, आदी मंडळींच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. हृदय तपासणीसाठी नेरुळ नवी मुंबई येथुन डॉ. कविता कदम, संजय गडकर, जयेश म्हात्रे, मनिषा वसावे, दर्शना मावशी यांचे मोलाचे योगदान लाभले. यामध्ये एकूण ६७ नागरिकांची तपासणी करण्यात आली. यापैकी २५ रुग्णांना २ डी ईको, स्ट्रेस टेस्टसाठी शुश्रुषा हार्ट केअर सेंटर नवी मुंबई येथे पाठविण्यात आले आहेत. शिबीर पार पाडण्यासाठी डॉ. निखिल गरुडे, डॉ. साधना झोलगे, डॉ. अंकित भोईर, डॉ.अश्विनी कुथे, लक्ष्मण खाडे, दिपक पाटील, अंशतः भुरे, दिलीप भोईर, दिनेश ठाकुर, प्रदिप केणी, दत्ताराम घासे, अनामिका लोहार, डॉ. योगिनी घायले, चेतन पोवळे, सुहग भोईर, विशाल दिवेकर, मोहन चोगळे, जीवन भोईर यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. तसेच शिबिरासाठी लागणारी सर्व मोफत औषधे परेश म्हात्रे ( पेण) यांनी वाटप केली.

निवडक



## मुरबा गणपती मंदिर वर्धापनदिन साजरा

**उरण :** मोरावे गाव येथील समुद्रात असलेल्या प्रसिद्ध श्री गणपती मंदिराचा वर्धापनदिन सोमवारी (दि. १) मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. सकाळच्या वेळेत गणेशपूजन आणि अभिषेक करण्यात आला. यावेळी गव्हाण-कोपर येथील श्री गुरुकृपा भजन मंडळाच्या गायिका सुप्रिया घरत-ठाकूर यांनी गणेशावर आधारित सुमधुर भजने सादर केली. त्यांना त्यांच्या सहकारी वादकांनी उत्तम साथ दिली. मुरबा गणपती ट्रस्टींनी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधले होते; परंतु ते आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी जिनिव्हा येथे असल्याने सहभागी होऊ शकले नाहीत. त्यांच्या वतीने एम.जी.ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते. महेंद्र घरत हे गणेशाचे निस्सीम भक्त असल्याने त्यांनी गणेशभक्तांचा समुद्रातील प्रवास सुखरूप व्हावा म्हणून १५ लाखांच्या दोन पॅसेंजर बोटी मुरबा गणपती देवस्थानला दान केल्या आहेत. त्यामुळे गणेशभक्त अतिशय आनंदाने पॅसेंजर बोटीतून प्रवास करून गणेशाचे दर्शन घेतात. सध्या कडक उन्हाळ्यामुळे सूर्य आग ओकत असतानाही छप्पर असणाऱ्या पॅसेंजर बोटींमुळे भक्तांचा प्रवास आनंदमयी झाला. त्यामुळे गणेशभक्तांनी महेंद्र घरत यांचे आभारही मानले. मुरबा गणपती देवस्थानचे ट्रस्टी शरद म्हात्रे, हेमंत पाटील, तेजस म्हात्रे, रितेश म्हात्रे यांनी वर्धापन दिनानिमित्त गणेशभक्तांची जय्यत तयारी केली होती.



## कडापेत जलजीवन योजनेचा शुभारंभ

**उरण :** उरण तालुक्यातील कडापे गावात जलजीवन योजनेचा शुभारंभ आठगाव पाणीकमिटीचे नवनियुक्त अध्यक्ष व जि.प. सदस्य अविनाश ठाकूर, आठगाव पाणी कमिटीच्या माजी अध्यक्षा आणि वशेणी ग्रा.पं. सरपंच अनामिका म्हात्रे, आवरे ग्रा.पं. सरपंच निराबाई पाटील, हितेंद्र म्हात्रे आणि सर्व आठगाव पाणीकमिटी सदस्य यांच्या प्रयत्नांतून करण्यात आला.ह्यावेळी कडापे पाणीकमिटीचे अध्यक्ष संतोष म्हात्रे, सचिव सरिता प्रशांत म्हात्रे, पाणीकमिटीचे सदस्य, कडापे गावचे ग्रामस्थ आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. अनेक वर्षांच्या प्रतिक्षे नंतर कडापे गावात नळपाणी योजनेचे पाणी आल्याने सर्व ग्रामस्थ व महिला भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. ह्यावेळी कडापे ग्रामस्थांनी सर्व आठगाव पाणीकमिटीचे आभार मानले.तसेच कडापे पाणीपुरवठा कमिटीचे अध्यक्ष संतोष म्हात्रे आणि सर्व सदस्य तसचे कडापे गावातील महिला भगिनी यांच्या अथक प्रयत्नांने कडापे गावातील पाण्याचा गंभीर असलेला प्रश्न सोडविल्याने कडापे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानत सर्वांचे अभिनंदन करण्यात करण्यात आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार कडापे गावातील आदर्श शिक्षक अशोक म्हात्रे यांनी केले.



## शेतकऱ्यांची बियाणे पेरणीला सुरुवात

**आगरदांडा :** मुरूड शहरांसह पंचक्रोशी भागांमध्ये खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला असून शेतकरी शेतात बियाणे पेरणीचे काम सुरू करताना दिसत आहेत. पावसाचे आगमन जवळ आल्याने अनेक ठिकाणी शेतात मशागतीची कामे पूर्ण करून बियाणे व खतांची जुळवाजुळव करण्यात शेतकरी व्यस्त आहेत.अनेक ठिकाणी ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी, मशागत आणि पेरणीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. मुरूड कुंभार वाड्यातील शेतकरी प्रसाद विलास जळगावकर व प्रसन्न जाळगावकर यांनी आपल्या शेतात मशागतीची कामे पूर्ण करून भात पिकांसाठी बियाणे पेरणीची तयारी केली आहे. तालुक्यात ३३०० हेक्टर भात लागवडीचं क्षेत्र असुन या क्षेत्रामध्ये शेतकरी सुवर्णा, जया, रूपाली, चिंटू, वाडा कोलम, रत्ना, शुभांगी, कर्जत व खारपट्ट्यात जमिनीवर पनवेल इत्यादी भाताच्या जातीची लागवड केली जाते.

## २ लाखांची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** एपीके फाईल पाठवून समोरच्याच्या मोबाईलचा ताबा घेऊन सायबर चोरट्याने २ लाख १ हजार ८०० रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची घटना कमोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामचंद्र जाधव हे कामोठे येथे राहत असून, अज्ञात सायबर चोरट्याने त्यांना तुमचे महानगर गॅस कनेक्शन बिल न भरल्यामुळे बंद होईल, अशी भीती दाखवली आणि त्यांच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर एपीके फाईल पाठवली. ती फाईल ओपन केली असता, अज्ञात सायबर चोरट्याने जाधव यांच्या मोबाईलचा ताबा घेऊन त्यांच्या बँक खात्यातून दोन लाख एक हजार आठशे रुपये रक्कम टप्याटप्याने वेगवेगळ्या बँक खात्यात ऑनलाइन ट्रान्सफर करून त्यांची फसवणूक केली. याप्रकरणी जाधव यांच्या तक्रारीवरून कामोठे पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **घरकामासाठी कायमस्वरूपी** राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : रु १४,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम, तसेच जेवणाची व्यवस्था करण्यात येईल. इच्छुकांनी संपर्क साधावा. ७८७५८६६५५५
- **अलिबाग एस.टी.स्टॅन्डजवळ** दूकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९.
- **ऑफिस वर्कसाठी मुलगा/मुलगी** पाहिजे. वेळ १० ते ६ कॉम्प्युटर नॉलेज व मराठी टायपिंग आवश्यक. पत्ता : धुमाळ हॉस्पिटलजवळ, चेंढरे-अलिबाग. अधिक माहितीकरीता संपर्क - ९३७३५८१३३५.
- **नाश्ता बनविण्यासाठी** बाई पाहिजे. ७०६६१३८३६८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# भाऊच्या धक्क्यावरुन धावणार बोट

**➢जेएनपीए ते मुंबई जलमार्गात बदल; पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जलवाहतूक विभागाचा निर्णय**

| उरण | प्रतिनिधी |

जेएनपीए बंदरातून मुंबई गेट वे ऑफ इंडिया अशी जलवाहतूक सुरू असते. मात्र पावसाळ्यात खवळणाऱ्या समुद्रापासून सावधानता म्हणून या जलमार्गात बदल करण्यात आला आहे. या मार्गावरील प्रवासी बोटी गेट वे ऑफ इंडियाऐवजी भाऊचा धक्का येथून ये-जा करणार असल्याची माहिती जेएनपीए जलवाहतूक विभागाने दिली.

जेएनपीए बंदर ते मुंबई अशी जलवाहतूक सेवा गेल्या ३७ वर्षांपासून सुरू आहे. पावसाळ्यात वादळी वारे, समुद्रात उसळणाऱ्या महाकाय लाटा यामुळे गेट वे ऑफ इंडियापर्यंत प्रवासी बोटींना प्रवास करणे धोक्याचे ठरते. त्यामुळे गेट वे ते अलिबाग, त्याचप्रमाणे गेट वे ते घारापुरी (एलिफंटा) येथील जल सेवाही बंद करण्यात येते.



मात्र उरणच्या मोरा ते मुंबई या जलमार्गावरील वाहतूक बारमाही सुरू असते.

त्याचप्रमाणे जेएनपीए ते मुंबई ही जलवाहतूकही सुरू ठेवण्यात येते. मात्र पावसाळ्यात या सेवेच्या मार्गात बदल केला जातो. जेएनपीए ते मुंबई जलमार्गात पावसाळ्यात समुद्राच्या भरतीमुळे समुद्रात ४ ते ५ मीटर उंचीच्या लाटा उसळतात.

या काळात गेट वे ऑफ इंडिया येथील लाटांचा प्रवासी बोटींना धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने या परिसरातील बोटी बंद करण्यात येतात. या वेळी जेएनपीए ते गेट वे ऑफ इंडियाऐवजी ही सेवा जेएनपीए ते भाऊचा धक्का अशी सुरू करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे जेएनपीए ते मुंबई जलमार्गात पावसाच्या कालावधीसाठी बदल करण्यात आला आहे. ही सेवा पावसाळ्यानंतर पुन्हा पूर्ववत होणार आहे, असे जेएनपीएचे जलवाहतूक विभागाचे कॅप्टन बाळासाहेब पवार यांनी सांगितले.

### असा होणार सेवेचा लाभ

**जेएनपीए लँडिंग जेट्टीवरून प्रवासी वाहतूक सेवा सुरू असते. त्यासाठी जेएनपीए कामगार वसाहतीमधून बस सेवा आहे. दर तासाने मुंबईसाठी बोट सुटत असल्याने ही सेवा थेट जेट्टीपर्यंत आहे. या जलमार्गाने जेएनपीए बंदरातील कामगार, कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी ही सेवा अत्यल्प शुल्कात आहे. तर बंदरावर आधारित उद्योगात काम करण्याऱ्या अधिकारी, कामगार, कर्मचारी आणि व्यावसायिकांना या सेवेचा लाभ घेता येतो.**

### विनाअडथळा प्रवास

**वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून अनेक ठिकाणी उड्डाणपूल व पर्यायी मार्गांची उभारणी केली जाते. मात्र तरीही अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. मात्र जेएनपीए ते मुंबई हा एक तासाचा प्रवास विनाअडथळा आणि प्रदूषणमुक्त प्रवास मानला जातो.**

# श्रीवर्धनचे पर्यटन व्यावसायिक सुखावले

| श्रीवर्धन | वार्ताहर |

पेशवेकालीन गाव, प्राचीन मंदिरे आणि तीन किलोमीटर लांबीचा निसर्गरम्य समुद्रकिनारा लाभलेल्या श्रीवर्धन येथे पर्यटकांची रेलचेल पाहायला मिळाली.शनिवार-रविवार आणि मे महिना अखेरीस सुट्ट्यांच्या निमित्ताने पर्यटकांनी हजेरी लावल्याने श्रीवर्धन हाऊसफुल्ल झाल्याचे दिसून येते.



श्रीवर्धनचा विस्तीर्ण आणि स्वच्छ समुद्रकिनारा पर्यटकांचे मुख्य आकर्षण ठरत आहे. समुद्रात पोहण्याचा आनंद घेण्याबरोबरच वाळूत किल्ले बनवणे याशिवाय घोडागाडी , उंट सफारीचा आनंद घेताना पर्यटक दिसले. श्रीवर्धनमधील रिसॉर्ट्स आणि होमस्टेंचे अनेक पर्यटकांनी आठवडाभर आधीच बुकिंग केल्याचे व्यावसायिकांकडून सांगण्यात आले. पर्यटकांकडून उकडीचे मोदक, सोलकढी, फणसाची भाजी या शाकाहारी पदार्थांना तर पापलेट, सुरमई, कोळंबी या सी फूड्सना विषेश मागणी असल्याचे हॉटेल चालकांनी सांगितले.

आंबा, फणस, जांभूळ, करवंदे या कोकणी मेव्याला पर्यटकांची पसंती असल्याचे दिसून आले त्याचप्रमाणे गृहउद्योगांना मोठी चालना मिळत आहे.घरगुती आंबा पोळी, फणस पोळी, कोकम सरबत, आवळा सरबत आणि औषधी आमसुलं यांना पर्यटकांकडून मागणी आहे.या गृह उद्योगामुळे महिलावर्गाला आर्थिक हातभार लागतो आहे.

> **मे महिना अखेरीस पर्यटकांचा प्रतिसाद चांगला मिळाला. श्रीवर्धन येथील जवळपास सर्व खोल्या आरक्षित होत्या आणि रेस्टॉरंटमध्येही मोठी गर्दी बघायला मिळाली.**
> **:- गणेश पोलेकर. रिसॉर्ट चालक, श्रीवर्धन.**

# खेमवाडीत पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती

| खोपोली | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील खेमवाडी ग्रामस्थ व खेमजाई नवतरुण मित्र मंडळ यांच्या वतीने ३१ मे रोजी लोककल्याणकारी, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्सव पार पडला. तर यावेळी गावात स्वच्छता अभियान राबवून एक वेगळा उपक्रम राबविण्यात आला आहे

या जयंती उत्सव सोहळ्याचे उद्घाटन पाली पंचायत समितीच्या सभापती जागृती मानकर यांच्या हस्ते राजामाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले तसेच जिल्हा परिषद सदस्या शर्मिला बोडके, पंचायत समिती सदस्या प्रणिता परदेशी सरपंच ताडगाव करुणा भीमचंद साठे, सदस्या मीनाक्षी देवराम खताळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले

तर प्रमुख मान्यवर अनंत कोंडू धायगुडे ग्रुप ग्रामपंचायत ताडगाव सदस्य, राकेश शरद साठे सदस्य ग्रुप ग्रामपंचायत ताडगाव, माजी सदस्य महेश देशमुख, प्रतीक्षा उमेश खताळ सदस्य वरवणे ग्रामपंचायत, आप्पा खताळ, किसन धायगुडे, पांडुरंग खताळ माजी सरपंच ताडगाव सामाजिक कार्यकर्ते शरद बोडके, राजेश मानकर, सचिन साठे, तुळशीराम धायगुडे, संजय साठे या प्रमुख मान्यवरंच्या उपस्थितीत हा जयंती उत्सव पार पडला.

## दागिने चोरून मोलकरीण पसार

**पनवेल :** खारघर येथील घरातून दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ५ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज चोरून मोलकरीण पसार झाल्याची घटना घडली. खारघर येथे राहणाऱ्या फिर्यादी यांच्या घरात मोलकरीण म्हणून काम करणाऱ्या महिलेने घरात कोणी नसल्याची संधी साधक तिच्याकडील चावीचा वापर करून त्यांच्या घरातील कपाटात ठेवलेले रोख रक्कम आणि चार तोळे वजनाचे दागिने चोरून नेले.

# पत्राशेड नसल्याने स्मशानभूमीत गैरसोय

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन दांडा येथील स्मशानभूमीत गेल्या अनेक महिन्यांपासून वीज पुरवठा खंडित आहे, तसेच येथील अंत्यसंस्कार विधी चौथऱ्यावर पत्राशेड नसल्याचे समोर आले आहे. या गंभीर समस्येमुळे अंत्यसंस्काराच्या वेळी मृतकांच्या नातेवाईकांना आणि दांडा परिसरातील ग्राम स्थांना मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

दांडा परिसरात भंडारी समाज, मधला कोळीवाडा, तक्का कोळीवाडा येथील कोळीसमाज आणि खारवीवाडा खारवी समाजाची स्मशानभूमी आहे.या स्मशानभूमीत विजेची कोणतीही व्यवस्था नसल्याने, रात्रीच्या वेळी जर कोणाचा मृत्यू झाला, तर अंत्यसंस्कार करणे कठीण जाते.अंधारामुळे नागरिकांना भ्रमणध्वनीची टॉर्च किंवा बॅटरीच्या उजेडात अंत्यविधी उरकावे लागतात. यावेळी अंत्यविधीसाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिकांना वीज व्यवस्था नसल्याने मनस्ताप सहन करावा लागतो.

स्मशानभूमीच्या चौथऱ्यावर पत्राशेड नसल्यामुळे पावसाळी दिवसांत परिस्थिती अत्यंत बिकट होते. मुसळधार पावसात चौथऱ्यावर चिता रचणे आणि पुढील विधी करणे अशक्य होते. शेड अभावी पावसाळ्यात अंत्यसंस्कारासाठी तासनतास वाट बघत उभे रहावे लागते.



### स्थानिकांची मागणी

दांडा परिसरातील नागरिकांना मृत व्यक्तीला सन्मानाने निरोप देता येत नाही. नगरपरिषद प्रशासनाने आमच्या समस्येची दखल घेत स्मशानभूमीत वीज जोडणी करावी आणि पावसाळा सुरू होण्याअगोदर चौथऱ्यावर पत्राशेड उभारावी, अशी मागणी श्रीवर्धन दांडा भंडारी समाज, मधला कोळीवाडा, तक्का कोळीवाडा कोळीसमाज आणि खारवीवाडा खारवी समाजाने केली आहे.

> **श्रीवर्धन दांडा स्मशानभूमी येथे चौथऱ्याची डागडुजी, संरक्षण भिंत, पत्राशेड आणि दिवाबत्तीची व्यवस्था लवकर करण्यात येईल.**
> **:- ॲड.अतुल चौगुले. नगराध्क्ष, श्रीवर्धन नगरपरिषद.**

# पाली-खोपोली राज्य महामार्गावर दारूच्या बाटल्यांचा पडला खच

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

पाली-खोपोली महामार्गावर आंबोले गावापासून ते थेट खुरवले पेट्रोल पंपाच्या पुढपर्यंत रस्त्यावर हजारो रिकाम्या दारू आणि बिअरच्या बाटल्या पडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. महामार्गावर मोठ्या प्रमाणावर या बाटल्या फुटल्या असून, रस्त्याभर काचांचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे या मार्गावरून जाणाऱ्या अनेक वाहनांच्या टायरमध्ये काचा घुसून टायर पंक्चर झाले असून, अपघाताचा अत्यंत गंभीर धोका निर्माण झाला आहे.



- **काचांमुळे वाहनांचे टायर पंक्चर**
- **अपघाताचा मोठा धोका**

ही घटना सोमवारी (दि.१) रात्रीच्या सुमारास घडली असावी. भंगार किंवा रिकाम्या बाटल्या वाहून नेणाऱ्या एखाद्या ओव्हरलोड ट्रक अथवा मालवाहू गाड्यातून या बाटल्या रस्त्यावर कोसळल्या असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. ट्रकचालकाच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडला असून, बाटल्या पडल्यानंतर संबंधित वाहन चालक तिथून पसार झाला असावा असे प्रवासी राहुल महाजन यांनी सांगितले.

## मंगळसूत्रासह रोख रक्कम चोरली

**पनवेल :** जीपच्या दरवाजाची काच फोडून अज्ञात चोरट्याने जीपमधील ११ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र आणि पन्नास हजार रुपये रोख चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

**ऑईल टँकर पलटी, हजारो लिटर तेलाची नासाडी | मृत्यूच्या सापळ्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष?**

# जेएनपीटी पोर्ट रोडवर प्रशासनाचा निष्काळजीपणा

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यात जेएनपीटी पोर्टकडे जाणाऱ्या अत्यंत वर्दळीच्या मार्गावर प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा पुन्हा एकदा फटका बसला आहे. पियूपी बिल्डिंग परिसरात आज सकाळी १०:४० वाजता तेलाने भरलेला एक ऑईल टँकर अचानक पलटी झाल्याने हजारो लिटर तेल रस्त्यावर सांडले. या अपघातामुळे पोर्टची वाहतूक काही काळ ठप्प झाली, तर रस्ता निसरडा होऊन दुसऱ्या मोठ्या दुर्घटनेचा धोका निर्माण झाला होता. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी, वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी प्रशासनाला जाब विचारला आहे.



उरण तालुक्यातील जेएनपीटी पोर्टकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर आज सकाळी तेलाने भरलेला टँकर पलटी झाला. घटनास्थळाजवळच इंडियन कस्टमचे कार्यालय असल्याने आणि हा मार्ग पोर्टसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने अपघातानंतर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. हजारो लिटर तेल रस्त्यावर सांडल्याने रस्ता पूर्णपणे निसरडा झाला आणि आणखी अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक नियंत्रित केली, मात्र तोपर्यंत मोठे आर्थिक व पर्यावरणीय नुकसान झाले होते.

स्थानिक नागरिकांनी प्रशासन आणि संबंधित विभागांवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जेएनपीटी पोर्ट रोडवर गेल्या काही महिन्यांपासून अपघातांची मालिकाच सुरू आहे. अवजड वाहनांची बेसुमार वर्दळ, रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक व्यवस्थापनातील त्रुटी आणि वेगमर्यादेचे सर्रास उल्लंघन होत असताना प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहे, असा आरोप नागरिकांनी केला. प्रत्येक वेळी अपघात झाल्यावर केवळ तात्पुरती मलमपट्टी केली जाते. एखाद्या दिवशी मोठी जीवितहानी झाली तर त्याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे हा रस्ता आता मृत्यूचा सापळा बनला आहे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र हजारो लिटर तेल वाया गेल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले असून तेल रस्त्यावर व गटारात मिसळल्याने पर्यावरणीय धोकाही निर्माण झाला आहे. तेलामुळे रस्ता निसरडा झाल्याने दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग अधिकच धोकादायक बनला आहे. नागरिकांनी या मार्गावर तातडीने सुरक्षा उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे. अवजड वाहनांवर कडक नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी करणे, वेगमर्यादा पाळण्यास भाग पाडणे आणि अपघातप्रवण ठिकाणांची तपासणी करून गतिरोधक, सूचना फलक यांसारख्या कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. केवळ अपघात झाल्यावर घटनास्थळी धाव घेणारे प्रशासन अपघात रोखण्यासाठी ठोस पावले कधी उचलणार, असा प्रश्न आता उरणकर विचारत आहेत. संबंधित विभागांनी वेळीच दखल न घेतल्यास यापेक्षाही मोठी दुर्घटना घडू शकते, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रणव शिवनाथ देसाई व सौ.पुजा प्रणव देसाई, रा.२१८, शामसुंदर, दुसरा मजला, २७ वा रस्ता, शॉपर्स स्टॉपच्या समोर, बांद्रा (प.), मुंबई, ४०००५०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १२/१/अ | १.०७.१० पो.ख. ०.०८.६० | ६.०० | श्री.गोपाळ बापुराव पोळ व श्री.श्रीकांत गोपाळ पोळ. |
| | एकुण १.१५.७० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०४/०६/२०२६.

सही /-
**अ‍ॅड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### निविदा सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी येथील वरिष्ठ विभागीय सिग्नल व दूरसंचार अभियंता यांच्या वतीने अनुभवी कंत्राटदारांकडून "रत्नागिरी विभागातील कोकण रेल्वेच्या खेड (केएचईडी) व कणकवली (केकेडब्ल्यू) स्थानकांवरील प्लॅटफॉर्म क्र. 1 च्या खुल्या परिसरात व शेड परिसरात आरडिएसओ/एसपीएन/टिसी/108/2019 आवृत्ती 1.0 अथवा अद्ययावत मानकांनुसार डबल फेस्ड कोच गाईडन्स डिस्प्ले बोर्ड (सीजीबीडी) पुरवठा, स्थापना, चाचणी व कार्यान्वियन करणे तसेच हमी कालावधी संपल्यानंतर 4 वर्षांसाठी सीएएमसी अंतर्गत सहाय्य प्रदान करणे" या कामासाठी ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-एसजी-टी-01ए-2026-27 दिनांक 04.06.2026, कामाची अंदाजित किंमत:** रु. 40.03/- लाख (जीएसटी वगळून), **ईएमडी रक्कम:** रु. 80,100/-, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** 18.06.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या: www.ireps.gov.in

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १)रजनी दिलीप पाटील | ५६ | २१ | १-०५-० | ० | १२ |
| उर्फ रजनी वासुदेव बडेकर २) वासुदेव धोंडु बडेकर | यापैकी लिहुन देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-२१-० मात्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,

सही /-
**अ‍ॅड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :- ०४/०६/२०२६

## जाहीर नोटीस

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

ज.नों.प्रस्ताव क्र.१६७/२०२६

१. इस्माईल याकुब दळवी,
रा.निजामपूर, ता.माणगाव, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, — सामनेवाले
ग्रामपंचायत निजामपूर, ता.माणगाव, जि.रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत निजामपूर, ता.माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव क्र. ४६७/२०२६, दि. २०/०३/२०२६ दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी इस्माईल याकुब दळवी, रा.निजामपूर, ता.माणगाव, जि.रायगड यांचा जन्म दि. ०१/०१/१९६३ रोजी मौजे निजामपूर, ता.माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

इस्माईल याकुब दळवी, रा. निजामपूर, ता.माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०१/०१/१९६३ रोजी मौजे निजामपूर, ता.माणगाव, जि.रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता.माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच इस्माईल याकुब दळवी, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत निजामपूर यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास इस्माईल याकुब दळवी, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०१/०१/१९६३ रोजी मौजे निजामपूर, ता.माणगाव, जि.रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : २०/०५/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार माणगाव**

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे वांदेली, ता.मुरूड, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक विजयकुमार सिताराम भगत यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे वांदेली, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वांदेली ता.मुरूड | ६२/१ | क्षेत्र १-०४-१० पो.ख. ०-२४-९० एकुण क्षेत्र १-२९-०० | ०.७१ |

वर नमुद मिळकतीमधील विजयकुमार सिताराम भगत यांच्या मालकीचे खाते क्र. ३४५ क्षेत्र ०-७७-०० हे.आर., पो.ख. ०-०८-०० हे. आर., एकुण क्षेत्र ०-८५-०० हे. आर., आकार ०.५३ /- रु. पैसे या जमिन मिळकतीपैकी क्षेत्र ०-४०-०० हे. आर., हि जमिन मिळकत व त्यामधील ग्रामपंचायत काकळथर हद्दीतील मालमत्ता क्र.८४१ ह्या मिळकतींचे

दिनांक : ०४/०६/२०२६
अशिलांची सही

**अ‍ॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे बेलवली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री.पराग राजाराम घरत, श्रीमती माया राजाराम घरत, श्री.श्वेत राजाराम घरत, श्रीमती वर्षा अभय पाठारे व श्रीमती मंदा केसरीनाथ घरत, राहणार बेलवली, ता. अलिबाग, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझ्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. पराग राजाराम घरत, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बेलवली, ता.अलिबाग. | १६५ | ०-४६-५० ०-१३-९० पो.ख. ०-६०-४० एकूण | ११-९६ |
| बेलवली. ता.अलिबाग. | १६६ | ०-०२-०० एकूण | ०-०५ |

अलिबाग,
दिनांक : ०३/०६/२०२६.

सही /-
**(अ‍ॅड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## ग्रुप ग्रामपंचायत मुंढाणी

मु,जांभळटेप, पो. बेणसे, ता. पेण, जि. रायगड.
Email : grampanchayatmundhani@gmail.com

**जाहीर निविदा**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत मुंढाणी येथील १५ वित्त आयोग सन २०२५/२६ ग्रा.प.स्तर अंतर्गत खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून करून घेणेसाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | नळ पाणी पुरवठा योजना विस्तारतीत लाईन टाकणे. | १५ वित्त आयोग ग्रा.प. स्तर | ६५६१९ | ६५६ |
| २ | जांभूळटेप गटार दुरुस्ती करणे. | | ६५६२० | ६५६ |
| ३ | रा.जि.शाळा जांभूळटेप पाणीपुरवठा करणे. | | २१८७९ | २२० |
| ४ | अंगणवाड्यांना फर्निचर कपाट, खुर्च्या पुरविणे. | | ८७४९ | ८८ |
| ५ | इतर मागासवर्गीय वस्तीमध्ये दिवा बत्ती/एल.ई.डी बल्बची सोय करणे. | | ८७५० | ८८ |
| ६ | ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती व रंगरंगोटी करणे. | | ३९३७२ | ३९४ |

**अटी व शर्ती :-**
१) सदरची कामे मा. उप अभियंता (बां.) रा.जि.प. उपविभाग पेण यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे.
२) कामाच्या मुल्यांकन रक्कमेतून अधिकृत करांची कपात करणेत येईल.
३) सर्व कामे अंदाजपत्रकाप्रमाणे करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
४) कामे पूर्ण झाल्यावर बिलाप्रमाणे/मुल्यांकनाशिवाय देयके अदा केली जाणार नाहीत.
५) सर्व निविदा स्वीकारनेचा व नाकारनेचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
६) कोणतीही निविदा स्वीकारल्या नंतर नाकारलेली निविदा कळवण्याची जबाबदारी नाही.

निविदा स्वीकारनेचा अंतिम दिनांक :-०९/०६/२०२६ रोजी संध्याकाळी ५.००वाजे पर्यंत.
निविदा उघडणेचा दिनांक :- १०/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत मुंढाणी**
**ता.पेण जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत मुंढाणी**
**ता.पेण जि.रायगड**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु.अलिबाग**
**मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात**
**अलिबाग - ४०२२०१**

दुरध्वनी क्र..०२१४१२२२४२८, Email: dslrraigad@gmail.com

क्र.अपील/एस.आर.२७/२०२६/ता.अलिबाग/जि.रायगड/२०२६/५३५ अलिबाग दिनांक ०२/०६/२०२६

## जाहिर नोटीस

प्रति
१. श्री. गणेश विठोबा पाटील
रा. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड — अपीलदार

**विरुद्ध**

१. श्री. सुरेश नामदेव पाटील — जाबदार
२. श्री. ऋषीकेश यशवंत पाटील
३. श्रीमती मिना यशवंत पाटील
रा. पांडवादेवी, पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड
४. सौ. रूपाली रोहिदास कोळी
रा. मु. पो. नागोठणे, ता. रोहा, जि रायगड
५. सौ. ऋणाली जितेश कोळी
रा. मांडवा, पो. धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड
६. सौ. ऋषाली राकेश पेढवी
रा. घसवड, पो. शहाबाज, ता.अलिबाग, जि.रायगड
७. सौ. प्रणाली राहूल पाटील
रा. चरी, पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड
८. सौ. कुंदा लहू कोळी
रा. बोडणी, पो. सारळ, ता.अलिबाग, जि.रायगड
९. सौ. मंजुळा दत्तात्रय पेढवी
रा. पांडवादेवी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड
१०. उप अधीक्षक भूमि अभिलेख, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

विषय :- मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ३४/१ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.
संदर्भ :- १. अर्जदार श्री. गणेश विठोबा पाटील यांचा दिनांक ०१/१२/२०२५ रोजीचा अपील अर्ज.
२. इकडील नोटीस क्र.अपील क्र.२७/२०२६/जा.क्र.४६२ दि. १८/०५/२०२६

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे.

सदर अपीलाच्या विलंब माफी अर्जावरील सुनावणीची तारीख ०६.०४.२०२६ १३.०४.२०२६, २०.०४.२०२६, २७.०४.२०२६, ०४.०५.२०२६, ११.०५.२०२६, १८.०५.२०२६, २५.०५.२०२६ व ०२.०६.२०२६ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार क्र.५ हे सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून पुढील सुनावणी दिनांक १६/०६/२०२६ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी दुपारी १२.३० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु.अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०२/०६/२०२६

सही/-
**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**रायगड, मु.अलिबाग.**

## टायटल व्हेरीफिकेशन कामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** :- तुकडी जिल्हा **ठाणे**, पोट तुकडी तालुका **मुरबाड**, यांचे हद्दीतील **मौजे सासणे** या गावाचे शिवारातील खाली नमुद केलेली मिळकत.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.प्र.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३६७ | ०१-२३-०० पो.ख. ००-१०-०० एकुण क्षेत्र ०१-३३-०० हे. आर. पैकी क्षेत्र ०-८०-०० हे. आर. | १.१२ |

ही दरोबस्त मिळकत.

सदर मिळकत श्रीम. अनिता अनंता मते, श्रीम. निराबाई चंद्रकांत विशे, माधुरी महेश म्हसे, यांचे वडिलोपार्जित मालकीची मिळकत असून, त्यांनी आमचे पक्षकारांबरोबर सदर मिळकतीचा व्यवहार निश्चित केलेला आहे. सदरील मिळकतीचे निर्वेधपणाविषयी खात्री करण्यासाठी प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

उपरोक्त नमुद मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा बोजा जसे गहाण, दान, लिन-लिज, अन्न-वस्त्र, विसार पावती, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, साठेखत, खरेदीखत, गहाणखत, विकसन करारनामा, जनरल कुलमुखत्यारपत्र, करारमदार, जप्ती इत्यादी स्वरुपाचा तसेच बँक बोजा असल्यास त्यांनी आवश्यक त्या मुळ लेखी साक्षांकित कागदपत्रांनिशी लेखी हरकती प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांनिशी खुलासा करावा. अन्यथा उपरोक्त नमुद मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजण्यात येईल.

मुदतीनंत र येणाऱ्या तसेच बिना कागदपत्रांचे हरकती तसेच परस्पर वर्तमानपत्रांत प्रसिध्द केल्या जाणाऱ्या हकरती विचारात घेतल्या जाणार नाही व ते आमचे पक्षकारांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक ०४/०६/२०२६**
**पक्षकाराची सही**
**पत्ता - फ्लॅट नं.ए/९०२, अंबर वास्तु, खरवई नाका,**
**तुलसी सिटी जवळ, बदलापूर पूर्व, ता. अंबरनाथ,**
**जि. ठाणे, ४२१५०३, मो. नं. ९१७५९१०३६०**

**श्री. सुमित के. अग्रवाल**
**(अ‍ॅडव्होकेट )**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
**काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि./जाहीर नोटीस/ / सन २०२६ दिनांक:-०२/०६/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री,व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

गुरुवर्य सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मुद्रे बुद्रुक, सर्व्हे नं. १२/२-अ, भूखंड क्र. ४, ५, ६, ता. कर्जत, जि. रायगड यांनी १. ज्योती प्रकाश तारळेकर, रा. अंबर सोसायटी, दिप बिल्डींग, कल्याण आर.टी.ओ. समोर,कल्याण(प.),जि.ठाणे- ४२१३०१, २.सुहास लोटण मिस्त्री, रा.ए १४, विशाल अपार्टमेंट, कोतवाल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

रायगड जिल्ह्यातील ता. कर्जत गाव मुद्रे बुद्रुक येथील भूमापन क्रमांक व उपविभाग - १२/२/अ/५, क्षेत्र २२२.४९ चौ.मी., भूमापन क्रमांक व उपविभाग -१२/२/अ/६, क्षेत्र २३०.३० चौ.मी. असे एकूण क्षेत्र ४५२.७९ चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २३/०६/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- ०२/०६/२०२६

सही/-
(त.सं.पाटील)
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे कोर्लई, ता.मुरूड, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत व त्यावर असणारी घर मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सिटी सर्व्हे नं. | क्षेत्र (चौ.मी.) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| कोर्लई, ता.मुरूड | ५१४ | १४८२.७० | अ |

ग्रामपंचायत कोर्लई मालमत्ता क्र. ३४२ अ, क्षेत्र ३३ चौ. फुट हि घर मिळकत

वर नमूद सदर नोटीसीचा विषय असलेल्या मिळकती हया विद्यमान मालक स्टीफन आलेक्स डिसोझा यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारीही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०३/०६/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**अ‍ॅड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस - लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर,
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक मनोहर देहु विर्ले, निराबाई दत्तू राणे, चंद्राबाई रमण तरे, कांताबाई सुदाम तरे, कल्पेश नामदेव विर्ले, माणिक हरिश्चंद्र केवणे, मिना राजेंद्र बागडे, संगीता गणेश धुळे, नंदिनी नामदेव हजारे यांनी त्यांचे वडीलाकपार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल यांना कायमस्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांबरोबर केलेली आहेत. मौजे-दहिवली तर्फे वरेडी, तालुका-कर्जत, जिल्हा -रायगड ४१०१०१ येथील शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| ४४/३/ई | ०.५२.०० जिरायत ०.०१.०० पो. ख ०.५३.०० एकूण या पैकी लिहून देणार यांनी खरेदी घेणार यांस विक्री करत असलेले क्षेत्र ०.३७.०० हे.आर.चौ.मी. | ०.५९ |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाईहुकूम, करारनामा व इतर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख : ०४/०६/२०२६

सही /-
**अ‍ॅड. जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल शेजारी,
धामोते, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड ४१०१०१,
मो. न. ८३६९२१७३१३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक वाळक्या झिपरु मुने वैगेरे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३२ | ७ | ०-२०-०० | १-३१ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसांचे खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०४/०६/२०२६

**अ‍ॅड. समीर आर.सावंत**
बी.कॉम. एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत,
जि. रायगड मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेतर्फे अधिकृत व्यक्ती श्री. मिलिंद भिकु शेळके, रा. बहिरमपाडा, ता. सुधागड जि. रायगड कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतींचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे खांडसई, ता. सुधागड, जि. रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार रु पैसे |
|---|---|---|---|
| १) गणेश सिताराम जांभुळकर | ७/६ | ००.३६.०० | ०.१२ |
| | ९/१/ब | ००.५८.९० | ७.४५ |
| | ११/१/ब | ००.८९.०० | ०.४७ |
| | ७/७ | ००.०३.०० | ०.०२ |
| २) किरण गजानन चोरघे व इतर | ७/९ | ००.१०.०० | ०.०३ |
| | ९/२ | ००.४०.०० | ७.१२ |
| ३) मोरेश्वर गेणू जांभुळकर व इतर ३ | ११/१/अ | २.२३.०० | ०.९७ |
| ४) प्रमोद जगन्नाथ पावगी | १४/१ | ००.३९.०० | ०.१६ |
| ५) एकनाथ रामचंद्र चोरघे व इतर ४ | १४/२ | ००.२१.०० | ०.०९ |
| ६) सहदेव गंगाराम सितापराव व इतर ५ | १४/४ | १.१९.०० | ०.७६ |
| ७) राजेंद्र रघुनाथ चोरघे व इतर ३ | २१ | ००.१२.४० | ०.२५ |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींच्या मालक यांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतींचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतींमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ३१/०५/२०२६

सही/-
**अ‍ॅड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - वर्णे, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १)श्री.राजेंद्र भिमराव कोलटक्के २) श्रीम.वैशाली ज्ञानेश पाटील ३) श्री.गुलाब गंगाराम सुळे | २७ | ५/ब | ७३.०० पैकी खरेदी देणार यांच्या मालकीची ५४.७५ गुंठे क्षेत्र मिळकत | ७३०-०० |

वर वर्णन केलेली बिनशेती मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.


दि. ०३/०६/२०२६

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो. ९५९५२११८६७

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# भारत भिडणार न्यूझीलंडला

■ ४० दिवसांचा ऐतिहासिक दौरा
■ ७ वर्षांत पहिल्यांदाच असं घडणार

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिन्ही फॉरमॅटमधील मालिकेचं वेळापत्रक आता समोर आलं आहे. या मालिकेची घोषणा यापूर्वीच झाली होती, पण स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर झालं नव्हतं. आता, न्यूझीलंड क्रिकेटने संपूर्ण वेळापत्रक प्रसिद्ध केलं आहे. या मालिकेदरम्यान टी-२०, एकदिवसीय आणि कसोटी सामने खेळले जातील.

भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार असून दोन्ही संघांमध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये मालिका खेळवली जाणार आहे. ऑक्टोबर ते डिसेंबरदरम्यान ही मालिका होणार आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात एक मोठी मालिका खेळवली जाणार आहे. याची सुरुवात टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेने होईल. या टी-२० मालिकेत पाच सामने असतील.

टी-२० मालिकेतील पहिला सामना २२ ऑक्टोबर रोजी खेळला जाईल. तर शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना १ नोव्हेंबर रोजी हॅमिल्टन येथे खेळवला जाईल. याशिवाय दोन्ही संघांमध्ये तब्बल पाच एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. या सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना ४ नोव्हेंबर रोजी ऑकलंड येथे खेळवला जाईल. मालिकेतील शेवटचा सामना १५ नोव्हेंबर रोजी खेळवला जाईल. तर कसोटी कसोटी मालिका १९ नोव्हेंबरपासून सुरू होईल. दुसरा कसोटी सामना २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान खेळवला जाईल.

एकदिवसीय मालिका पुढील वर्षी होणाऱ्या २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीसाठी महत्त्वाची असणार आहे, तर कसोटी मालिका जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचा भाग म्हणून खेळवली जाईल. ही मालिका भारतीय संघासाठी अत्यंत महत्त्वाची असेल, कारण वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप गुणतालिकेत भारतीय संघ गुणतालिकेत टॉप-५ च्या बाहेर आहे. भारताला जर अंतिम फेरीत पोहोचायचं असेल, तर त्यांना दोन्ही सामने जिंकावे लागतील. पण न्यूझीलंडच्या भूमीवर हे सोपे काम नसणार आहे.

न्यूझीलंड आणि भारत तिन्ही फॉरमॅटमध्ये मिळून एकूण १२ सामने खेळतील, जो न्यूझीलंड क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात मोठा दौरा ठरेल. २०१९ नंतर न्यूझीलंडमध्ये भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील हा पहिला कसोटी सामना असेल. भारतापाठोपाठ, न्यूझीलंड क्रिकेट श्रीलंकन संघाचेही यजमानपद भूषवेल. या दौऱ्यात तीन टी-२०, तीन एकदिवसीय आणि दोन कसोटी सामन्यांचा समावेश असेल. संपूर्ण वेळापत्रकही जाहीर करण्यात आले आहे.



### टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेचं वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| पहिला टी-२० सामना | २२ ऑक्टोबर | क्राइस्टचर्च |
| दुसरा टी-२० सामना | २४ ऑक्टोबर | क्राइस्टचर्च |
| तिसरा टी-२० सामना | २७ ऑक्टोबर | वेलिंग्टन |
| चौथा टी-२० सामना | ३० ऑक्टोबर | ऑकलंड |
| पाचवा टी-२० सामना | १ नोव्हेंबर | हॅमिल्टन |

### वनडे मालिकेचं वेळापत्रक

पहिला एकदिवसीय सामना : ४ नोव्हेंबर : ऑकलंड
दुसरा एकदिवसीय सामना : ७ नोव्हेंबर : वेलिंग्टन
तिसरा एकदिवसीय सामना : १० नोव्हेंबर : हॅमिल्टन
चौथा एकदिवसीय सामना : १३ नोव्हेंबर : माउंट माउंगानुई
पाचवा एकदिवसीय सामना : १५ नोव्हेंबर : माउंट माउंगानुई

### संपूर्ण कसोटी मालिकेचं वेळापत्रक


पहिली कसोटी : १९ ते २३ नोव्हेंबर : वेलिंग्टन
दुसरी कसोटी : २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर : क्राइस्टचर्च

## निवडक



### प्रज्ञानानंदाने कार्लसनला हरवले

**नवी दिल्ली :** भारताचा २० वर्षीय ग्रँडमास्टर प्रज्ञानानंदा रमेशबाबूने नॉर्वे चेस २०२६ च्या आठव्या फेरीत जगातील नंबर-१ खेळाडू आणि पाच वेळा वर्ल्ड चॅम्पियन मॅग्नस कार्लसनला हरवले. प्रज्ञानानंदाचा कार्लसनविरुद्ध या स्पर्धेतील हा दुसरा विजय आहे.यापूर्वी २८ मे रोजी त्याने पांढऱ्या मोहऱ्यांनी हरवले होते. मंगळवारी त्याने काळ्या मोहऱ्यांनी विजय मिळवला. या विजयासह आर. प्रज्ञानानंदा भारताचा दुसरा असा खेळाडू बनला आहे, ज्याने एकाच स्पर्धेत मॅग्नस कार्लसनला दोनदा हरवले आहे. क्लासिकल बुद्धिबळाच्या गेल्या १९ वर्षांत ही पहिलीच वेळ आहे, जेव्हा एखाद्या खेळाडूने एकाच स्पर्धेत कार्लसनला दोनदा हरवले आहे. यापूर्वी २००७ मध्ये विश्वनाथन आनंदने लिनारेस आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कार्लसनला सलग दोन सामन्यांत पराभूत केले होते.आठव्या फेरीतील आणखी एका क्लासिकल सामन्यात फ्रान्सच्या अलीरेझा फिरोजाने सध्याचा वर्ल्ड चॅम्पियन भारताच्या गुकेश डोमराजुला हरवले. पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या फिरोजाने वेळेच्या दबावाखाली अंतिम टप्प्यात उत्कृष्ट खेळ दाखवला आणि गुकेशच्या चुकांचा फायदा घेतला. या विजयामुळे फिरोजाचे १३ गुण झाले आहेत. स्पर्धेतील आघाडीवर असलेले वेस्ली सो आणि विन्सेंट केमर यांच्यातील क्लासिकल सामना बरोबरीत सुटला. त्यानंतर झालेल्या मआर्मागेडनफसामन्यात वेस्ली सोने विजय मिळवून अतिरिक्त गुण मिळवले आणि १४ गुणांसह आघाडी कायम राखली.




### भारतीय ॲथलीट डोपिंगमध्ये अडकली

मुंबई : भारतीय क्रीडाक्षेत्रात गेल्या काही वर्षात प्रगती होताना दिसत आहे. खेळातील वेगवेगळ्या प्रकारात नावलौकिक मिळवला जात आहे. असं असताना क्रीडाक्षेत्रावर डोपिंगचं सावट आहे. प्रत्येक वर्षी कोणता ना कोणता खेळाडू डोपिंगमध्ये अडकत आहे. आता या यादीत केएम दीक्षा हीचं नाव जोडलं गेलं आहे. महिलांच्या १५०० मीटर शर्यतीत धावपटू दीक्षाने नॅशनल विक्रम नोंदवला होता. पण आता ती डोपिंगच्या आरोपामुळे चर्चेत आली आहे. ट्रिब्यूनच्या एका रिपोर्टनुसार, दीक्षाला याबाबतची माहिती दिली गेली आहे. तिच्या सॅंपलमध्ये प्रतिबंधित पदार्थ आढळून आला आहे. रिपोर्टनुसार, मिडिल डिस्टेंस धावपटू दीक्षाच्या सॅंपलमध्ये स्टॅनोजोलोल आढळलं आहे. हे वर्ल्ड अँटी डोपिंग एजेंसीच्या प्रतिबंधित सब्सटांसच्या यादीत आहे. त्यामुळे तिच्यावर कारवाई होऊ शकते. सध्या तरी दीक्षावर कोणताही कारवाई करण्यात आलेली नाही. पण यात दोषी आढळली तर चार वर्षांची बंदी घातली जाऊ शकते. त्यामुळे तिचं ग्लासगो कॉमनवेल्थ गेम्समध्ये खेळणं कठीण आहे. भारताचं यामुळे खूप मोठं नुकसान झालं आहे.

### मेन्सिक फ्रेंच ओपन उपांत्य फेरीत

**पॅरिस :** चेक रिपब्लिकच्या २० वर्षीय खेळाडू याकूब मेन्सिकने पहिल्यांदाच ग्रँड स्लॅमच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवले. मंगळवारी रात्री पॅरिसमध्ये खेळल्या गेलेल्या मेन्स सिंगल्सच्या उपांत्यपूर्व फेरीत मेन्सिकने १९ वर्षीय ब्राझीलच्या खेळाडू जोआओ फोंसेकाला ६-४, ६-३, ७-६(३) ने हरवले.हा सामना या वर्षीच्या फ्रेंच ओपनमधील सर्वात तरुण उपांत्यपूर्व सामना होता. आता उपांत्य फेरीत मेन्सिकचा सामना जर्मनीच्या दुसऱ्या सीडेड अलेक्झांडर ज्वेरेवशी होईल. दोन तास ३३ मिनिटे चालला सामना, तिसऱ्या सेटमध्ये पिछाडीवर पडल्यानंतर मेन्सिकने शानदार पुनरागमन केले. याकूब मेन्सिक आणि ब्राझीलचा जोआओ फोंसेका त्यांच्या कारकिर्दीतील पहिला ग्रँड स्लॅम उपांत्यपूर्व सामना खेळत होते. दोन्ही तरुण खेळाडूंमधील सामना दोन तास ३३ मिनिटे चालला. मेन्सिकने सुरुवातीचे दोन सेट सहज जिंकले.



# उरणच्या ८ खेळाडूंची गरुडझेप

## महाराष्ट्र आईस हॉकी संघात निवड; राष्ट्रीय स्पर्धेत करणार राज्याचे प्रतिनिधित्व!

। उरण । प्रतिनिधी ।

उरणमधील तब्बल आठ खेळाडूंनी महाराष्ट्र आईस हॉकी संघात स्थान मिळवून तालुक्याचा नावलौकिक वाढवला आहे. राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड झाली असून, ते उत्तराखंडमधील देहरादून येथे महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

आईस हॉकीसारख्या प्रामुख्याने हिमालयीन प्रदेशात खेळल्या जाणाऱ्या आणि विशेष कौशल्याची गरज असणाऱ्या खेळात उरणसारख्या किनारपट्टीच्या भागातून खेळाडू तयार होणे ही अत्यंत उल्लेखनीय आणि कौतुकास्पद बाब मानली जात आहे. १२ वर्षांखालील गटात वरदा आसरकर, शिवांश तांडेल, १५ वर्षांखालील गटात अर्थ सावंत, रुद्र घरत, रेवा पाटील, १८ वर्षांखालील गटात सुरज करण, सीनियर गर्ल्स गटात स्नेहा शेळके, शर्वणी या सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

या खेळाडूंच्या यशामागे श्री स्केटिंग अकॅडमीचे संस्थापक व प्रशिक्षक प्रीती पाटील आणि राकेश पाटील यांचे मोलाचे योगदान आहे.

बर्फावर खेळल्या जाणाऱ्या या अत्यंत वेगवान आणि रोमांचक खेळात शारीरिक तंदुरुस्ती, विवेक संतुलन आणि चपळ निर्णयक्षम तेची गरज असते. महाराष्ट्रात स्केटिंगच्या माध्यमातून या खेळाचा प्रसार वेगाने वाढत आहे.

या सर्व खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधी प्रतिनिधित्व करताना उत्कृष्ट कामगिरी करावी आणि उरणच्या क्रीडा इतिहासात मानाचा तुरा रोवावा अशी अपेक्षा विश्वस्त आणि क्रीडाप्रेमींकडून व्यक्त केला जात आहे.





# उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

। रायगड । प्रतिनिधी ।

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग, जिल्हा क्रीडा परिषद, रायगड यांच्या माध्यमातून विविध खेळांची माहिती व्हावी तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा व चांगले खेळाडू तयार व्हावेत याकरिता २५ मे ते १० जून या कालावधीत सकाळी ठिक सात ते नऊ या वेळेत उन्हाळी क्रीडा कौशल्य व व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षण शिबिरात अथलेटिक्स, कराटे, तायक्कांदो, योगा, लगोरी अशा विविध खेळांचा समावेश करण्यात आला आहे.

सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षक म्हणून आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तपस्वी गोंधळी, क्रीडा मार्गदर्शक यतीराज पाटील, प्रियांका गुंजाळ यांचे प्रशिक्षण लाभत असून या प्रशिक्षण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.



# कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी अंतिम फेरीत

। पोयनाड । प्रतिनिधी ।

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित पै. अन्वर बुराण स्मृतीचषक चौदा वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी लोधीवली संघाने धडाकेबाज कामगिरी करत अंतिम फेरीत धडक दिली आहे.

अंतिम फेरीत त्यांचा सामना फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाबरोबर होणार आहे. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी संघाने जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाचा १४९ धावांनी पराभव केला असून जगदीश क्रिकेट अलिबाग संघाला स्पर्धेत तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी संघाने निर्धारित ४० षटकांमध्ये अवघा एका फलंदाज गमावत २७३ धावा काढल्या त्यामध्ये सलामीवीर तंत्रशुद्ध फलंदाज शुभंकर माने यांनी धडाकेबाज फलंदाजी करत १०० धावा काढून शतक पूर्ण केले,त्याला सुयश पारंगे यांनी ८७ यश पार्टे ४६ धावा काढून संघाला योगदान दिले.

### टेबल टेनिस स्पर्धेचे पनवेलमध्ये आयोजन

**रायगड :** रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनच्या मान्यतेने नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळातर्फे नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा सिडको समाज मंदिर, दुसरा मजला, सेक्टर १८, नवीन पनवेल येथे महाराष्ट्र शासनाचे शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महानगर पालिकेचे स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम यांच्या शुभहस्ते सकाळी ९.३० वाजता करण्यात येणार आहे. बीगनर मुले आणि मुली, ११ वर्षा खालील मुले आणि मुली, १३ वर्षांखालील मुले आणि मुली, १५ वर्षांखालील मुले आणि मुली, १७ वर्षांखालील मुले आणि मुली, १९ वर्षांखालील मुले आणि मुली, महिला व पुरुष आणि वेटरन पुरुष अशा गटांमध्ये स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

# बोर्लीपंचतनचा प्रथम क्रीडा महोत्सव संपन्न

। कापोली । प्रतिनिधी ।



गुरुद्वारा मैदान, सानपाडा, नवी मुंबई येथे गावदेवी क्रिकेट क्लब मुंबई (बोर्ली पंचतन) चा पहिला क्रीडा महोत्सव संपन्न झाला. यावेळी श्रीवर्धन म्हसळा तालुक्यातील ३२ क्रिकेट संघाने सहभागी घेतला होता. या मंडळाची स्थापना गतवर्षी ३१ मे २०२५ झाली असून वेगवेगळे उपक्रम राबवित यंदाच्या मोसमातील ही पहिलीच स्पर्धा ३१ मे २०२६ गुरुद्वार मैदान सानपाडा नवी मुंबई येथील मैदानावर आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन समयी प्रमुख पाहुणे दत्तात्रेय धनावडे, ॲड. धनंजय चौलकर, विराज गायकर, अनंत पाटील अजय पयेर, आदेश धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

पारितोषिक वितरण श्रीवर्धन पंचायत समिती सदस्य सुकुमार तोंडलेकर व ड्रग्स फ्री फ्युचर फाऊंडेशन नवी मुंबईचे अध्यक्ष नरेश चाळके यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक गावदेवी सकलप खूर्द, द्वितीय क्रमांक खरगाव बुद्रूक, तृतीय क्रमांक नानारे क्रिकेट क्लब तर चतुर्थ क्रमांक खरगाव बुद्रूक यांनी पटकाविले.

गावदेवी क्रिकेट क्लब मुंबईचे अध्यक्ष हेमंत धनावडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आज आमच्या संघाचा प्रथम क्रीडा महोत्सव संपन्न झाला यावेळी आमच्या सर्व सदस्यांनी योग्यती मेहनत घेऊन आपला क्रीडा महोत्सव यशस्वीरित्या पार पाडला. तसेच या स्पर्धेला ज्यांनी ज्यांनी सढळ हस्ते आर्थिक व वस्तूरूपी मदत केली अश्या देणगीदारांचे आभार व्यक्त करुन पुढेही असेच सहकार्य करण्याचे आवाहन केले. या स्पर्धेत समालोचक नितीन गायकर आणि बंटी (कोडे पंचतन) पंच व लेखनिक रितेश, मनिष, अक्षय, शैलेश, दिप, राज, अनिकेत,कल्पेश, महेश, अनिरुद्ध, प्रेम, प्रणय, प्रतीक, धनेश, प्रथम, अजय, मनोज यांनी उत्तम कामगिरी बजावली.

## नाथन एलिसने घेतल्या ४ विकेट | शादाब खानची ७१ धावांची खेळी व्यर्थ

# ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या वनडेत पाकिस्तानला हरवले

। लाहोर । वृत्तसंस्था ।



लाहोरमधील गद्दाफी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा ४१ धावांनी पराभव केला. यामुळे मालिका १-१ अशी बरोबरीत सुटली. नाथन एलिसने ३३ धावांत ४ बळी घेतले.

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत २३१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ ४४ षटकांत १९० धावांवर सर्वबाद झाला. शादाब खानने १०४ चेंडूत ७१ धावा केल्या, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.

५१ धावांवर ३ बळी गमावल्यानंतर जोश इंग्लिस आणि कॅमेरॉन ग्रीन यांनी सावध फलंदाजी केली. दोघांनी चौथ्या विकेटसाठी ५१ धावांची भागीदारी केली.त्यानंतर मॅट रेनशॉने ४३ आणि ऑलिव्हर पीकने ३२ चेंडूत ३१ धावा करून संघाला २३१ धावांपर्यंत पोहोचवले.

२३२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. नॅथन एलिस आणि मॅट कुहनेमनने पहिल्या दोन षटकांत दोन्ही सलामीवीरांना बाद केले. ऑस्ट्रेलियाने १२ षटकांच्या आत ५८ धावांवर पाकिस्तानचे ५ बळी घेतले होते. बाबर आझम आणि माज सदाकत अपयशी ठरले.

एकेकाळी पाकिस्तानचा पराभव निश्चित वाटत होता, पण शादाब खान आणि अराफात मिन्हास यांनी सहाव्या विकेटसाठी ५९ धावा जोडल्या. पायात पेटके येऊनही शादाब क्रीजवर टिकून राहिला. हारिस रऊफसोबतच्या २१ धावांच्या भागीदारीत शादाबनेच सर्व धावा केल्या.

मात्र, दुसऱ्या टोकाकडून विकेट पडत राहिल्या. नॅथन एलिसने रऊफला बोल्ड करून पाकिस्तानची शेवटची आशा संपवली. शादाब खान ७१ धावा काढून तनवीर संघाच्या गोलंदाजीवर स्टंप आऊट झाला.

# साईराज बहुतुले स्पिन बॉलिंग प्रशिक्षक

। मुंबई । प्रतिनिधी ।

टीम इंडिया अफगाणिस्तान विरुद्ध ६ जूनपासून एकमेव कसोटी सामना खेळणार आहे. शुबमन गिल या सामन्यात टीम इंडियाचं नेतृत्व करणार आहे. हा सामना न्यू चंडीगडमधील महाराजा यादवेंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर इथे आयोजित करण्यात आला आहे.

या सामन्याआधी बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयने साईराज बहुतुले यांना मोठी जबाबदारी सोपवली आहे. साईराज बहुतुले यांची टीम इंडियाच्या स्पिन बॉलिंग कोचपदी नियुक्ती केली आहे.

साईराज बहुतुले आयपीएल स्पर्धेच्या १९ व्या मोसमात पंजाब किंग्सच्या कोचिंग स्टाफमध्ये होते. साईराज यांच्यावर पंजाब किंग्सच्या स्पिन बॉलिंग कोचपदाची जबाबदारी होती. तसेच साईराज त्याआधी २०१८ ते २०२१ या दरम्यान राजस्थान रॉयल्सच्या कोचिंग स्टाफचा भाग होते.

त्यानंतर साईराज काही काळ एनसीएसोबत होते. राहुल द्रविड टीम इंडियाचे हेड कोच असताना साईराज यांनी काही मालिकांमध्ये सहाय्यक प्रशिक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली होती.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)